दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

**सुविचार**

"यशस्वी व्यक्ती तोच असतो जो त्याच्या पराभवातून काहीतरी नवीन शिकतो. तसेच यशाची पाठ सोडू नका. कारण यश हे कठीण परिश्रमाच्या पाठीमागे लपलेले असते."

**नव्या नोटीसची गरज नाही**

**कोची** : कर्जवसुलीबाबत बँकांच्या अधिकारांना बळकटी देणारा महत्त्वपूर्ण निर्णय केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे. सरफेसी कायद्यानुसार कर्जदाराला मागणी नोटीस (डिमांड नोटीस) त्याच्या हयातीत योग्यरीत्या बजावली गेली आणि त्यानंतरची अनिवार्य ६० दिवसांची मुदत कर्जफेड न करता संपली, तर बँकेचा कर्जवसुलीचा वैधानिक अधिकार 'पूर्ण' होतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. ३१ डिसेंबर, २०२५ | वर्ष - १ | अंक - ९८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### कर्नाटकतील निर्णय पक्षनेतृत्वाने घ्यावा

**बेंगळुरू** : कर्नाटकचे गृहमंत्री जी परमेश्वरा यांनी सांगितले की, काँग्रेस हायकमांडला नेतृत्वाच्या मुद्द्यावर काही निर्णय घ्यायचा असेल तर त्यांनी फेब्रुवारीमध्ये अर्थसंकल्प तयार होण्यापूर्वी ते करावे. नेतृत्व बदलावे की नाही हे काँग्रेस हायकमांड ठरवेल. अर्थसंकल्पाची तयारी फेब्रुवारीमध्ये सुरू होईल, साधारणपणे आणखी एक महिना. हायकमांडला या मुद्द्यावर काही निर्णय घ्यायचा असेल तर त्यांनी त्यापूर्वीच निर्णय घ्यावा, असे त्यांनी म्हटले आहे.

### सायबर फसवणूक रॅकेटचा पर्दाफाश

**नवी दिल्ली** : दिल्ली पोलिसांनी बनावट स्टॉक ट्रेडिंग अर्जाद्वारे कार्यरत असलेल्या सायबर फसवणूक सिंडिकेटचा पर्दाफाश केला असून, एका महिलेची २२.७ लाख रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली हरियाणातील दोन पुरुषांना अटक केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. १३ नोव्हेंबर रोजी डॉ. अमिता गर्ग यांनी दाखल केलेल्या तक्रारीनंतर चौकशी सुरू झाली. तिला मेसेजिंग ॲप ग्रुपमध्ये जोडण्यात आले होते, जिथे प्रशासक डी-मॅट शेअर गुंतवणुकीबाबत सल्ला देत असत.

### विधान परिषदेसाठी उमेदवार जाहीर

**बेंगळुरू** : कर्नाटक विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या नोव्हेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी काँग्रेसने आपले उमेदवार जाहीर केले. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी चार उमेदवारांच्या नावांना मान्यता दिली आहे. पश्चिम पदवीधर मतदारसंघासाठी मोहन लिंबिकाई आणि दक्षिण पूर्व पदवीधर मतदारसंघासाठी शशी हुलिकुंटेमुट यांना उमेदवारी दिली आहे, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

## पाच लोकप्रतिनिधी सरकार दरबारी

# ...तरी पिंपरी पालिका कर्जबाजारी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या डोक्यावर तब्बल १२ हजार कोटी रुपयांचा कर्जबोजा असल्याचा आरोप होत असून, त्यावरून राजकीय वातावरण तापले आहे..**



पिंपरी-चिंचवड पालिका ही राज्यातील सर्वाधिक महसूल असलेल्या महापालिकांपैकी एक मानली जातो. औद्योगिक शहर, मोठा करआधार, आयटी आणि ऑटोमोबाईल कंपन्यांची उपस्थिती, तसेच झपाट्याने वाढणारी लोकसंख्या यामुळे ही महापालिका आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखली जाते. मात्र, प्रत्यक्षात चित्र वेगळे आहे. सरकार दरबारी येथील पाच लोकप्रतिनिधी असताना, महापालिका कर्जबाजारी कशी झाली, असा प्रश्न त्यामुळेच उपस्थित होत आहे.

शंकर जगताप, चिंचवड विधानसभा, महेश लांडगे, भोसरी विधानसभा, अण्णा बनसोडे, पिंपरी विधानसभा तसेच विधानसभेचे उपाध्यक्ष, उमा खापरे, विधानपरिषद सदस्य आणि अमित गोरखे विधान परिषद असे भरभक्कम लोकप्रतिनिधीत्व शहराला लाभले आहे, हे विशेष.

पिंपरी-चिंचवडमधील कर्जाचा मुद्दा निवडणुकीच्या निमित्ताने ऐरणीवर आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या कर्जावरून भाजप आमदार महेश लांडगे यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका करत, आशियातील श्रीमंत महापालिकांपैकी एक असलेली पालिका कर्जात कशी गेली? असा सवाल केला. अजित पवारांच्या या विधानामुळे कर्जाचा मुद्दा हा प्रशासकीय न राहता थेट राजकीय संघर्षाचा विषय बनला आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये पाच आमदार असूनही, महापालिकेचे आर्थिक नियोजन कमकुवत का ठरले, याचे विश्लेषण करताना विकासकामांचा वेग, मोठ्या पायाभूत प्रकल्पांचा खर्च, कंत्राटी पद्धतीतील निर्णय आणि प्रशासकीय नियंत्रणाचा अभाव या बाबी पुढे येतात. गेल्या काही वर्षांत रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, उड्डाणपूल, मेट्रो जोडणी अशा अनेक प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च झाला. मात्र या खर्चाच्या तुलनेत उत्पन्न वाढीचे ठोस नियोजन झाले का, यावर प्रश्नचिन्ह आहे. राजकीय पातळीवर पाहिले तर, पाच आमदार असूनही एकत्रित भूमिका न घेता, दोषारोपांचे राजकारण सुरू असल्याचे चित्र दिसते. सत्ताधारी आमदार प्रशासनाकडे बोट दाखवतात, तर विरोधक सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर टीका करतात. या संघर्षात महापालिकेची आर्थिक शिस्त दुय्यम ठरत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महापालिकेवर १२ हजार कोटींच्या कर्जाचा दावा प्रशासनाकडून फेटाळला जात असला, तरी कर्ज वाढत असल्याची वस्तुस्थिती नाकारता येत नाही. सरकारदरबारी पाच प्रतिनिधी असूनही, शहराला कर्जाच्या गर्तेत जाण्यापासून वाचवता आले नाही, ही बाब पिंपरी-चिंचवडच्या राजकारणाची मर्यादा दाखवणारी आहे. महापालिका निवडणुकीत हा मुद्दा निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

## नववर्षातही आठवा वेतन आयोग लागू होणार नाही?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगाला अधिकृत मंजुरी दिली असून या आयोगाच्या अध्यक्षपदी निवृत्त न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्ती वेतनधारकांना (पेन्शनर्स) तात्काळ वाढीव पगार मिळणार नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. आयोगाच्या शिफारसी लागू होण्यासाठी अजून वेळ लागणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या वेतन आयोगाला मंजुरी दिल्यानंतर लाखो कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र, अनेक दिवसांपासून पगारवाढीची अपेक्षा असलेल्या कर्मचाऱ्यांना लगेचच त्याचा फायदा मिळणार नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. हा आयोग केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते आणि पेन्शन यांचा सखोल आढावा घेऊन सरकारला शिफारसी सादर करणार आहे. वेतन आयोगाच्या शिफारसी साधारणपणे दर दहा वर्षांनी लागू केल्या जातात. सरकारच्या अधिसूचनेनुसार, वेतन आयोगाच्या शिफारसी १ जानेवारी २०२६ पासून लागू होण्याची अपेक्षा आहे. मात्र, आयोगाला आपला अहवाल सादर करण्यासाठी सुमारे १८ महिने दिले गेले आहेत. याचा अर्थ असा की १ जानेवारी पासून लगेच पगार वाढणार नाही, असे आता स्पष्ट झाले आहे.

## बांगलादेशात हिंदूंवर हल्ले सुरूच; आणखी एकाची हत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका** : बांगलादेशमध्ये अल्पसंख्याक हिंदूंवरील हल्ले सुरूच आहेत. सोमवारी, २९ डिसेंबर रोजी संध्याकाळी उशिरा एका हिंदू तरुणाची हत्या करण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे, ही हत्या त्याच मैमनसिंग भागात घडली, जिथे काही दिवसांपूर्वी जमावाने ईश्वनिंदेच्या आरोपाखाली दीपू चंद्र डे यांना मारहाण करून ठार मारले होते. दोन आठवड्यांतील ही तिसरी हत्या आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बांगलादेशच्या ग्रामीण निमलष्करी दलाचे सदस्य बजेंद्र बिस्वास यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. बिस्वासचा सहकारी नोमान मियाँ याला गोळीबाराचा आरोप आहे आणि त्याला अटक करण्यात आली आहे. बजेंद्र बिस्वास हे मैमनसिंग जिल्ह्यातील एका कपड्याच्या कारखान्यात सुरक्षा रक्षक म्हणून ड्युटीवर होते तेव्हा त्यांच्या सहकाऱ्याने त्यांच्यावर गोळीबार केला. सोमवारी संध्याकाळी ६:४५ वाजता भालुका उपजिल्हा परिसरातील लबीब ग्रुपच्या कपड्याच्या युनिट सुलताना स्वेटर लिमिटेडमध्ये ही घटना घडली. पीडितेचे नाव ४२ वर्षीय बजेंद्र बिस्वास असे आहे, तर आरोपी २९ वर्षीय नोमान मियान याला अटक करण्यात आली आहे. बजेंद्र बिस्वास हा सिल्हेट सदर उपजिल्हामधील कादिरपूर गावातील रहिवासी पवित्रा बिस्वास यांचा मुलगा होता. आरोपी नोमान मियान हा सुनामगंज जिल्ह्यातील ताहिरपूर पोलिस स्टेशन परिसरातील रहिवासी आहे.

## महापालिकेतील लढतीत महायुतीच्या पक्षांमध्येच लढत

# पवारांची ब्ल्यूप्रिंट पालिकेला तारणार का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी:** पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्या आणि त्याच वेळी भाजप-शिवसेना युती झालेली नाही. हा योगायोग नसून, राज्याच्या राजकारणात सुरू असलेल्या मोठ्या पुनर्रचनेचा संकेत आहे. महाराष्ट्रात शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू आहे. याबाबतचे वृत्त दैनिक राज्य लोकतंत्रने दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी प्रकाशित केले होते.



आज पुण्यात आणि पिंपरी-चिंचवड येथे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची अशक्य बाब शक्य झालेली आहे, त्याचवेळी, भाजप-शिवसेना युती प्रत्यक्षात आलेली नाही. आता ही युती हेतूतः केलेली नाही का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार असल्याने, राष्ट्रवादीची हक्काची मतपेढी आता दुभागली जाणार नाही. भाजप-शिवसेना एकत्र लढले असते, तर युती विरोधात राष्ट्रवादी अशी थेट लढत झाली असती. मात्र, आता ही लढत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी अशा महायुतीतील तीन घटक पक्षांतच होणार आहे. म्हणजेच, पुण्यातील मतदाराला कारभारी कोण, याची निवड करण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे. विरोधी पक्षांना यात फारसा अवकाश महायुतीने बाकी ठेवलेला नाही.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड हे राष्ट्रवादीचे पारंपरिक बालेकिल्ले. येथे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणे, हा स्थानिक स्वार्थाचा निर्णय आहे. भाजपाचा प्रभाव वाढत असताना, आपापसातील फुटीमुळे बालेकिल्ला हातातून जाण्याचा धोका पवारांनी ओळखला आहे. या प्रक्रियेचा राज्याच्या राजकारणावर मोठा परिणाम होऊ शकतो. एकत्र आलेली राष्ट्रवादी शिस्तबद्धपणे काम करू लागली, तर महाविकास आघाडीच्या समीकरणांवर त्याचा थेट परिणाम होईल. काँग्रेस आधीच कमकुवत अवस्थेत आहे. राष्ट्रवादी एकसंघ झाली, तर राज्यातील विरोधी राजकारणाचे केंद्र पुन्हा पवारांकडे सरकेल. शरद पवार सक्रिय राजकारणातून बाजूला होत असताना, पुढच्या पिढ्यांसाठी मोकळे मैदान तयार करत आहेत. अशा वेळी पक्ष, विचारसरणी किंवा जुने शत्रुत्व यापेक्षा राजकीय स्थैर्य आणि सत्तेतील स्थान अधिक महत्त्वाचे ठरते. त्यामुळे राज्याच्या पातळीवर नवे समीकरण उभे राहिले, तर त्याचे बीज पुणे-पिंपरीतच पेरले गेले, असे म्हणावे लागेल.

या सगळ्यात सुप्रिया सुळे यांचे राजकीय भवितव्य हा महत्त्वाचा मुद्दा आहे. राष्ट्रवादी एकत्र येणे आणि अजित पवार यांची राज्यातील पकड मजबूत होणे, याचा थेट फायदा सुप्रिया सुळे यांना होतो. दिल्लीतील राजकारणात त्यांची स्वीकारार्हता आहे, संवादकौशल्य आहे आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांचा वावर आहे. मंत्रीपद असो किंवा पक्षातील राष्ट्रीय नेतृत्वाची भूमिका असो. त्यांचे भवितव्य पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित झाले आहे, असे म्हणता येईल. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादींचे एकत्र येणे ही स्थानिक घटना नाही, तर ती राजकारणातील सत्तासंतुलन बदलण्याची नांदी आहे.

# बीडमध्ये टोल नाक्यावर दहशत

## एकाच कुटुंबावर २० ते २५ जणांचा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड** : बीड जिल्ह्यातील पाटोदा ते मांजरसुंबा रोडवरील वैद्यकिन्ही टोल नाक्यावर सोमवारी रात्री दहशतीचे वातावरण पाहायला मिळाले. एका कुटुंबाच्या तीन सदस्यांवर २० ते २५ जणांच्या टोळक्याने लाकडी दांडके आणि लोखंडी रॉडने क्रूर मारहाण केली.

या हल्ल्यात भाऊ, बहीण आणि त्यांचा भाचा गंभीर जखमी झाले आहेत. रक्ताच्या थारोळ्यात असलेल्या जखमींना तातडीने बीडच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप निर्माण झाला असून टोल नाक्यावरील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पीडित कुटुंबाने तातडीने पाटोदा पोलिसांशी संपर्क साधून तक्रार दिली, मात्र पोलीस यांनी तक्रार घेण्यास विलंब केला, असा गंभीर आरोप नातेवाईकांनी केला आहे. मारहाण करणारे आरोपी राजकीय वरदहस्त असलेले असल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. या दबावाखाली पोलिस सुरुवातीला मदत करण्यास नकार देत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

संतप्त नातेवाईक आणि ग्रामस्थांनी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढून आरोपींना तात्काळ अटक करण्याची आणि कडक कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी त्यांनी पोलीस प्रशासनाला निवेदन दिले आणि आपली व्यथा मांडली.

मारहाण करणारे आरोपी यापूर्वीच्या एका खून प्रकरणातील संशयित असल्याचे नातेवाईकांनी सांगितले. त्यांनी म्हटले की, आरोपींना मोकाट सोडणे धोकादायक आहे. जर पोलिसांनी प्रकरणात लवकर कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नातेवाईकांनी दिला.

वैद्यकिन्ही टोल नाक्यावर ही पहिलीच मारहाण नाही. यापूर्वीही अनेक प्रवासी आणि तरुण यावर हल्ल्याचा शिकार झाले आहेत. एका मागील हल्ल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात मोठ्या प्रमाणावर टोळक्यांद्वारे लोकांवर हल्ले केले जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. रात्रीच्या वेळी दबा धरून बसलेल्या टोळक्याने या कुटुंबावर हल्ला केल्याचे किरण बांगर आणि शिवराज बांगर यांनी सांगितले आहे. बीडमध्ये घडलेली ही घटना कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंदवडे काढणारी ठरली असून, परिसरातील सुरक्षा, पोलीस कार्यक्षमता आणि गुंडगिरीविरोधात जनतेची असंतोषाची भावना दाखवणारी ठरली आहे. त्यामुळे संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होताना दिसून येत आहे.

## उत्तर प्रदेशातील एसआयआर मोहीम

# मसुदा यादी ६ तारखेला प्रकाशित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ** : निवडणूक आयोगाने उत्तर प्रदेशात सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या वेळापत्रकात सुधारणा केली आहे, ज्यामध्ये मसुदा मतदार यादी आता ६ जानेवारी २०२६ रोजी प्रकाशित होणार आहे आणि अंतिम यादी ६ मार्च रोजी प्रकाशित होणार आहे, असे राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी नवदीप रिनवा यांनी मंगळवारी एका निवेदनात म्हटले आहे. नवीन वेळापत्रकानुसार, ६ जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत दावे आणि हरकती मागवल्या जातील, असे त्यांनी सांगितले.

रिनवा म्हणाले की, सूचना टप्पा, दावे आणि हरकतींचे निपटारा आणि गणनेच्या फॉर्मवरील निर्णय ६ जानेवारी ते २७ फेब्रुवारी पर्यंत सुरू राहतील, त्यानंतर अंतिम मतदार यादी ६ मार्च रोजी प्रकाशित केली जाईल. राज्यात मतदार यादीची मोठ्या प्रमाणात छाटणी करण्यात आली आहे, अशा विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रियेची कडक छाननी सुरू असताना वेळापत्रकात सुधारणा करण्यात आली आहे.

'शुद्ध निर्वाचक नामावली, मजबूत लोकतंत्र' (स्वच्छ मतदार यादी, मजबूत लोकशाही) या थीमसह आयोजित सुमारे ५२ दिवसांचा एसआयआर सराव ४ नोव्हेंबर रोजी सुरू झाला आणि दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर २६ डिसेंबर रोजी संपला.

अधिकृत आकडेवारीनुसार, मसुदा मतदार यादीत सुमारे १२.५५ कोटी मतदारांचा समावेश असण्याची अपेक्षा आहे, ज्यामध्ये मृत्यू, निवासस्थान बदलणे किंवा दुबार नोंदणी अशा कारणांमुळे सुमारे २.८९ कोटी नावे एसआयआरपूर्वीच्या यादीतून वगळण्यात आली आहेत. ज्यांना वगळण्यात आले आहे ते दावे आणि हरकती कालावधीत वगळण्यावर आक्षेप घेऊ शकतील.

# भाजपा-सेनेची १४ शहरांत युती तुटली

## अर्जांच्या अखेरच्या दिवशी राजकीय धामधूम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकांमुळे राजकीय वातावरण तापले असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी सर्वच पक्षांत मोठ्या प्रमाणावर हालचाली दिसून आल्या. उमेदवारी जाहीर होताच अनेक ठिकाणी जल्लोष झाला, तर ऐनवेळी तिकीट नाकारल्याने नाराजीचे सूरही उमटले. दीर्घकाळ पक्षाशी निष्ठा राखलेल्या कार्यकर्त्यांना डावलल्याचा आरोप होत असतानाच, काही ठिकाणी अलीकडेच पक्षांतर केलेल्या नेत्यांना उमेदवारी दिल्याने अंतर्गत असंतोष उफाळून आला आहे.

या पार्श्वभूमीवर, महायुतीतील प्रमुख घटक असलेल्या भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जागावाटपावरून ताणतणाव उघड झाला आहे. अनेक महानगरपालिकांमध्ये अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळाल्याचा भाजपचा आक्षेप, तर काही ठिकाणी स्थानिक समीकरणांचा दाखला देत शिंदे गटाने युती नाकारल्याचे चित्र आहे. परिणामी, दोन्ही पक्षांनी काही शहरांत स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

याचा थेट परिणाम राज्यातील तब्बल १४ महानगरपालिकांवर झाला आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नांदेड, अमरावती, मालेगाव, अकोला, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, धुळे, उल्हासनगर, सांगली, छत्रपती संभाजीनगर आणि जालना या महापालिकांमध्ये भाजप-शिंदे गटाची युती तुटली आहे.

या शहरांत आता तिरंगी किंवा बहुरंगी लढती रंगण्याची शक्यता असून, स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांसाठी ही निवडणूक अधिक आव्हानात्मक ठरणार आहे.

दरम्यान, राज्यातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या मुंबई आणि ठाणे महानगरपालिकांमध्ये मात्र भाजप आणि शिंदे गटाने युती कायम ठेवली आहे. मात्र, या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना युतीत सामावून घेतलेले नाही. त्यामुळे मुंबई आणि ठाण्यातील राजकीय समीकरणे वेगळी असून, महायुतीतील अंतर्गत समतोल कसा राखला जातो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## बीएसएफच्या वतीने जम्मू तसेच वाळवंटी भागाचा समावेश

# घुसखोरी रोखण्यासाठी एलओसीवर विशेष मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर : काश्मीर सीमेवरील भूभाग आणि जम्मूच्या महत्त्वाच्या सुरक्षा चौक्यांपासून ते राजस्थानच्या विस्तीर्ण वाळवंटापर्यंत, आव्हानात्मक भारत-पाकिस्तान सीमा आणि नियंत्रण रेषेवरील सीमा सुरक्षा दल त्यांचे वार्षिक 'ऑपरेशन सार्द हवा' सुरू करणार आहे. हिवाळ्यातील दाट धुक्यामुळे कमी दृश्यमानतेचा फायदा घेऊन घुसखोरीचे संभाव्य प्रयत्न हाणून पाडण्याचा हा त्यांचा उद्देश आहे..**



देहरादूनमध्ये सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) लवकरच काश्मीर सीमावर्ती भागात, जम्मूमधील सुरक्षा चौक्यांमध्ये आणि राजस्थानच्या वाळवंटी भागात विशेष मोहीम हाती घेतआहे. दाट धुक्यामुळे कमी दृश्यमानतेचा फायदा घेऊन घुसखोरीचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी ही कारवाई केली जाईल. बीएसएफ अधिकाऱ्यांनी सांगितले की ही कारवाई पुढील महिन्यात सुरू होईल आणि जानेवारीच्या अखेरीपर्यंत सुरू राहील. प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाच्या आधी सीमेवरील सुरक्षा मजबूत करणे हे त्याचे मुख्य लक्ष आहे. जम्मूमध्ये तैनात असलेल्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, "ऑपरेशन 'सरद हवा' हे घुसखोरीच्या प्रयत्नांना रोखण्यासाठी आहे कारण हिवाळ्यात दाट धुके आणि धुके अशा कारवायांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करतात. या दरम्यान, भारत-पाकिस्तान सीमेवर उच्चस्तरीय सुरक्षा उपाययोजना केल्या जातात, दक्षता आणि गस्त वाढवली जाते. काश्मीर फ्रंटियरच्या आणखी एका अधिकाऱ्याने सांगितले की, नियंत्रण रेषेवर सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी बीएसएफच्या शस्त्रागारात समाविष्ट असलेल्या रडार आणि सेन्सर-आधारित उपकरणे आणि काही आधुनिक उपकरणे तैनात करण्यात आली आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता ड्रोन-आधारित देखरेख देखील वाढविण्यात आली आहे. विशेष ड्रोन कमांडो आणि ड्रोन योद्धे तसेच बीएसएफच्या दुर्गा वाहिनी युनिट्स देखील तैनात केल्या जातील. हिवाळ्यात सीमेपलीकडून घुसखोरीच्या प्रयत्नांबाबत गुप्तचर माहिती लक्षात घेऊन हवाई देखरेख मजबूत केली जात आहे, असे त्यांनी सांगितले.

कमांडरना अखंड संवाद सुनिश्चित करण्याचे आणि नियमित सराव करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, कोणत्याही धोक्याच्या परिस्थितीला प्रतिसाद देण्यासाठी मजबूत प्रतिसाद योजना आखल्या पाहिजेत, असे राजस्थान फ्रंटियरच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. ते म्हणाले की ऑपरेशन कोल्ड विंड हा जम्मू आणि काश्मीर आणि राजस्थानमध्ये बीएसएफ द्वारे आयोजित वार्षिक हिवाळी सुरक्षा सराव आहे. यात काश्मीर क्षेत्रातील आव्हानात्मक भूभाग, जम्मू आणि थार वाळवंटातील प्रमुख सुरक्षा चौक्या, आंतरराष्ट्रीय सीमेवरील महत्त्वाचे भाग आणि नियंत्रण रेषा (एलओसी) यांचा समावेश आहे.

## उत्तर भारतात थंडीमुळे शाळांना सुट्टी जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली:** उत्तर भारतातील दाट धुके आणि अत्यंत थंडीमुळे नोएडा आणि संपूर्ण गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातील शाळा काही दिवसांसाठी बंद राहणार आहेत. जिल्हा प्रशासनाने मुलांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेचा विचार करत सर्व शाळांना १ जानेवारी पर्यंत सुट्टी जाहीर केली आहे. यामध्ये नर्सरीपासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे, ज्यामुळे लाखो विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना दिलास मिळाला आहे.

दाट धुके आणि थंड हवामान मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकते. त्यामुळे शाळा बंद ठेवणे अत्यंत गरजेचे ठरले आहे. हा आदेश सर्व मान्यताप्राप्त शाळा – केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, उत्तर प्रदेश मंडळ तसेच सरकारी आणि खासगी शाळांसाठी लागू आहे.

नर्सरी ते बारावीपर्यंतच्या वर्गांना संपूर्णपणे स्थगित केले गेले असून, प्रशासनाचा असा विश्वास आहे की सकाळच्या धुक्यातून किंवा रात्रीच्या थंडीत मुलांचे आरोग्य धोक्यात येऊ नये. तरीही, शिक्षक आणि शाळेतील कर्मचारी त्यांच्या कामावर नियमित उपस्थित राहतील, असे आदेशात नमूद केले आहे. सर्व शाळा व्यवस्थापनांना आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. शाळा २ जानेवारी २०२६ पासून सुरू होतील, जेव्हा परिस्थिती सामान्य होईल. हा आदेश बिहार आणि झारखंडमधील शालेय वर्गांवरही थंडीचा परिणाम दिसून येत आहे. बिहारमध्ये शाळा ३० डिसेंबरपर्यंत बंद राहतील, तर झारखंडमध्ये थंडीच्या लाटेमुळे शाळा ३१ डिसेंबरपर्यंत बंद ठेवण्यात आल्या आहेत.

## संपादकीय

### पुणे हे निमित्तमात्र!

**पुण्यात अखेर भाजप आणि शिवसेना यांची युती तुटली असे सांगितले जात आहे. पुण्यात घडली ती केवळ एक घटना. प्रत्यक्षात ही घटना महाराष्ट्राला आरसा दाखवणारी अशीच. यातून योग्य तो धडा संबंधित घेतील, अशी अपेक्षा आहे. राज्यातील असंतोषाला पुण्याने वाचा फोडली, हे मात्र नक्की.**

अखेर पुण्यात भाजपा–शिवसेना युती तुटली, असे आता सांगितले जाते. प्रत्यक्षात पुण्यात तुटलेली युती ही एक घटना आहे, ती बातमी नाही. बातमी ही आहे की, ती महाराष्ट्राच्या राजकारणाची अवस्था दर्शवणारी आहे. पुण्याने पुन्हा एकदा राज्याला आरसा दाखवण्याचे काम केले असून, त्या आरशात दिसणारे चित्र सुखावह नक्कीच नाही. जागावाटपाच्या कारणावरून युती फुटली, असे अधिकृत स्पष्टीकरण आहे. प्रत्यक्षात राजकारणात अधिकृत कारणे नेहमीच अपुरी असतात. पुण्यातील वाद हा आकड्यांचा नाही, तर अहंकाराचा ठरला. कोण मोठा, कोण उपयुक्त आणि कोण फक्त सहन करतो, या प्रश्नांची उत्तरे युतीत आधीच ठरलेली असतात. पुण्यात ती उघड झाली, इतकेच. भाजप आज महाराष्ट्रात सत्तेच्या केंद्रस्थानी आहे. सत्ता केंद्रस्थानी आली की, सोबती बदलतात, भाषा बदलते आणि सहकाऱ्यांकडे पाहण्याची नजरही बदलते. काल जे भागीदार होते, ते आज ओझे वाटू लागतात. शिवसेनेची पुण्यातील अवस्था ही त्याचे उत्तम उदाहरण. सत्ता मिळाली, पण स्वायत्तता नाही. पदे मिळाली, पण प्रतिष्ठा नाही. अशा अवस्थेत स्वबळाचा नारा हा आत्मविश्वासाचे द्योतक नसून तो अस्वस्थतेचा प्रतिक ठरला आहे. शिवसेनेचा प्रश्न हा पुण्यापुरता मर्यादित नाही. बाळासाहेब ठाकरेच्या शिवसेनेचे विभाजन झाल्यानंतर, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला स्वतःचे अस्तित्व सातत्याने सिद्ध करावे लागत आहे. भाजपाच्या सावलीत राहून ते शक्यही नाही, हेच पुण्याने दाखवून दिले. त्यामुळे युती तुटली नाही, तर ती शिवसेनेला झुगारावी लागली. हा फरक एकदा समजून घेतला, तरच राज्यातील राजकारण नीट समजेल. पुण्याच्या या घटनेतून महायुतीचे स्वरूप स्पष्ट होते. ही युती मूल्यांवर उभी नाही, तर ती गरजेवर उभी आहे. गरज संपली की संबंध संपतात. निवडणुका जवळ आल्या की ही गरज तीव्र होते, निवडणुका दूर असतील, तर सहनशीलता वाढीस लागते. त्यामुळेच महायुतीत तणाव दिसून येतो. हा वैचारिक नाही, तर तो सत्तात्मक आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचा संदर्भ महत्त्वाचा ठरतो. राष्ट्रवादी सर्वत्रच एकत्र येईल की नाही, हा प्रश्न दुय्यम. मुख्य प्रश्न हा आहे की, राष्ट्रवादी एकत्र आली की, सध्याचे सत्तासमीकरण अस्थिर होईल आणि हीच अस्थिरता महायुतीला अस्वस्थ करते. त्यामुळे प्रत्येक घटक आपापली ताकद स्वतंत्रपणे जोखू लागला आहे. पुण्यातील स्वबळाचा निर्णय हा त्याच प्रयोगाचाच एक भाग. पुणे हे महाराष्ट्राच्या राजकारणात नेहमीच दिशा देणारे ठरले आहे. सामाजिक बदल असोत वा राजकीय कल, पुणे आधी संकेत देते, राज्य त्यानंतर दिशा बदलते. आज पुण्यात युतीचे तुटलेले धागे दिसत असतील, तर उद्या राज्यभर सर्वत्र असेच चित्र दिसेल, याची शक्यता नाकारता येत नाही. सत्तेत असलेल्या पक्षांना वाटते की प्रशासन चालवणे म्हणजे राजकारण करणे. प्रत्यक्षात कोणत्या पक्षाकडे सूत्रे नसतानाही, प्रशासन कारभार हाकण्यात सक्षम असते. मात्र, राजकारण टिकते ते विश्वासावर. पुण्याच्या निमित्ताने राज्यात युतीचा चेहरा उघडा पडला. युती आहे, पण विश्वास नाही. सत्ता आहे, पण स्थैर्य नाही. आकडे आहेत, पण दिशा नाही. अशी ही महायुतीची विदारक अवस्था. पुण्याने काही नवे घडवलेले नाही. पुण्याने फक्त एवढेच केले आहे की, महाराष्ट्राच्या राजकारणात चाललेल्या विसंवादाला शब्द दिले आहेत. प्रश्न हा आहे की, राज्य ते शब्द ऐकणार का, की नेहमीप्रमाणे त्याकडे दुर्लक्ष करणार? पुण्याचा अनुभव सांगतो, दुर्लक्षाची किंमत सत्तेलाच मोजावी लागते. राज्यात सर्वत्र असंतोषाला वाचा फुटताना दिसून येते आहे. पुण्यातून त्याची नांदी झाली, इतकेच.

# पश्चिमी वर्चस्वाला भारताचे आव्हान!

**जागतिक राजकारणात मोठा बदल घडतो आहे, असा दावा सातत्याने केला जातो. पश्चिमी वर्चस्वाची सद्दी संपत चालली असून, भारत नव्या जागतिक व्यवस्थेचा केंद्रबिंदू ठरेल, असे चित्र मांडले जाते. मात्र, हा बदल घडून येण्यासाठी कोणकोणत्या बाबी कारणीभूत आहेत, याचे वास्तववादी विश्लेषण गरजेचे आहे.**




अलीकडच्या काळात जागतिक राजकारणाबाबत एक सूर वारंवार ऐकू येतो आहे की, दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिमी देशांनी उभारलेली जागतिक सत्ता-रचना आता कालबाह्य होत असून, तिची पकड सैल होत चालली आहे आणि त्या रिकाम्या जागेत भारतासारखा देश पुढे येऊ शकतो. ही मांडणी आकर्षक तर आहेच, त्याशिवाय ती आत्मविश्वास वाढवणारीही आहे. मात्र, असे ठोस विधान करताना, वस्तुस्थिती नेमकी काय, हेही तपासून पाहण्याची गरज. कारण जागतिक सत्ता-समीकरणे ही निव्वळ घोषणांनी बदलत नाहीत, तर ती दीर्घ काळ चाललेल्या आर्थिक, राजकीय आणि सामरिक प्रवाहांतून घडत असतात. पश्चिमी वर्चस्वाला आव्हाने वाढत आहेत, हे कोणीही नाकारणार नाही. अमेरिका आणि युरोपकेंद्रित व्यवस्था आज अनेक पातळ्यांवर दबावाचा सामना करत आहे. युक्रेन युद्धामुळे युरोपची ऊर्जा-आर्थिक असुरक्षितता उघडी पडली, अमेरिकेची आंतरराष्ट्रीय हस्तक्षेपाची क्षमता आणि इच्छाशक्ती दोन्ही मर्यादित होत असल्याचे दिसते, तर जागतिक अर्थव्यवस्थेत चीन, आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका यांचा सहभाग लक्षणीयरित्या वाढतो आहे. मात्र या बदलाला कोसळणे, असे म्हणणे चुकीचे ठरेल. पश्चिमी व्यवस्था अजूनही संस्थात्मकदृष्ट्या मजबूत असून, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, तंत्रज्ञान, संरक्षण आणि वित्तीय प्रणालींमध्ये पश्चिमी देशांचा प्रभाव आजही मोठ्या प्रमाणावर कायम आहे. या बदलत्या जगात भारताचे स्थान नक्कीच महत्त्वाचे झाले आहे. भारत आता लोकसंख्येच्या जोरावर चर्चेत राहणारा देश राहिलेला नसून, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान आणि डिजिटल पायाभूत सुविधा, संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेचे प्रयत्न आणि सक्रिय कूटनीती यामुळे भारताकडे एक संभाव्य जागतिक शक्ती म्हणून पाहिले जाते. विशेषतः विकसनशील देशांच्या प्रश्नांवर भारताने घेतलेली भूमिका, बहुपक्षीय मंचांवर मांडलेली मते आणि कोणत्याही एका गटात पूर्णपणे न अडकण्याची भूमिका यामुळे भारत वेगळा भासतो. तथापि, प्रभाव वाढणे आणि नेतृत्व स्वीकारणे यांत फरक आहे. भारताचा प्रभाव नक्कीच वाढतो आहे, पण तो अद्याप निर्णायक स्वरूपाचा झाला आहे, असे म्हणता येत नाही. आजचे जग बहुध्रुवीय आहे. अमेरिका, चीन, युरोप, रशिया, मध्य-पूर्वेतील देश, तसेच प्रादेशिक शक्ती यांचे हितसंबंध एकमेकांवर आदळत आहेत. अशा परिस्थितीत कोणताही एक देश सर्वांना दिशा देईल, अशी रचना तयार झालेली नाही. भारतही याला अपवाद नाही. भारताची परराष्ट्रनीती मुळातच सावध आहे. ती संघर्ष टाळणारी, समतोल राखणारी आणि व्यवहार्य आहे. भारत पश्चिमी देशांशी सहकार्य करतो, त्याच वेळी तो रशियाशी संबंध तोडत नाही, चीनशी स्पर्धा आहे, पण संबंध पूर्णपणे तोडलेले नाहीत, मध्य-पूर्वेतही सर्व बाजूंशी संवाद ठेवला जातो. ही भूमिका हीच नेतृत्वाची खूण आहे, पण ती क्रांतिकारी बदलाची नव्हे, तर हळूहळू प्रभाव वाढवणारी आहे. त्यामुळे भारत एकाएकी जागतिक व्यवस्थेचा केंद्रबिंदू बनेल, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. बहुपक्षीय गटांच्या संदर्भातही हेच धोरण लागू होते. विविध देश एकत्र येऊन पर्यायी मंच उभे करत आहेत, पण हे मंच एकसंध नाहीत. त्यात अंतर्गत मतभेद, स्पर्धा आणि परस्परांवर संशय कायम आहे. भारत आणि चीन यांच्यातील संबंध हे याचे सर्वात उदाहरण. त्यामुळे अशा मंचांच्या माध्यमातून एक नवीन जागतिक व्यवस्था लवकरच उभी राहील, असे म्हणणे वास्तवाशी फारकत घेणारे ठरू शकते. पश्चिमी देशांबद्दल वाढत असलेली नाराजीही समजून घ्यावी लागते. लोकशाही, मानवी हक्क आणि नियमाधारित जागतिक व्यवस्थेची भाषा करणाऱ्या देशांनी अनेकदा दुहेरी निकष लावले आहेत. यामुळे त्यांच्या नैतिक नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. पण त्याच वेळी, त्या देशांकडे असलेली संस्थात्मक ताकद, नवोन्मेष क्षमता आणि आर्थिक प्रभाव सहज नाहीसे होणारे नाहीत. जागतिक व्यवस्था बदलते आहे, पण ती एका बाजूने कोसळत आणि दुसऱ्या बाजूने नव्याने उभी राहत आहे, असे सरळ चित्र नाही. या सगळ्यात भारतासाठी संधी नक्कीच आहे. जागतिक पातळीवर अधिक जबाबदारी घेण्याची, विकसनशील देशांचा आवाज बनण्याची आणि बहुपक्षीय संस्थांमध्ये सुधारणा घडवून आणण्याची ही योग्य वेळ आहे. पण त्या संधीचा अर्थ असा नाही की, भारत लगेचच जागतिक नेतृत्वाच्या शिखरावर पोहोचेल. त्यासाठी अंतर्गत आर्थिक समावेशन, सामाजिक स्थैर्य, शेजारील देशांशी संबंध आणि दीर्घकालीन धोरणात्मक स्पष्टता आवश्यक आहे. म्हणूनच, आजच्या जागतिक बदलांकडे पाहताना अति-उत्साह किंवा अति-आत्मविश्वास टाळणे गरजेचे आहे. भारत उदयाला येतो आहे. हा प्रवास दीर्घ आणि गुंतागुंतीचा आहे. जग एका जुन्या व्यवस्थेच्या शेवटाकडे आणि नव्या व्यवस्थेच्या सुरुवातीकडे एकाच वेळी चालले आहे. त्या प्रक्रियेत भारत महत्त्वाचा खेळाडू ठरेल. कदाचित तो दिशा देणारा घटकही ठरेल, पण एकमेव केंद्रबिंदू बनेल, असे ठामपणे सांगणे आज तरी कठीण आहे. जागतिक राजकारणात निर्णायक क्षण सहसा शांतपणे घडतात. घोषणांपेक्षा वास्तव, दाव्यांपेक्षा सातत्य आणि अपेक्षांपेक्षा संयम यांचीच अशावेळी कसोटी लागते. भारत त्या कसोटीकडे वाटचाल करतो आहे, एवढे मात्र निश्चित.

# नाट्यप्रेक्षागृहातून लोकशाहीचा जागर

## स्वीप अंतर्गत मतदान जनजागृती; 'अथर्व सुदामे लाईव्ह...' नाट्यप्रयोगावेळी उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाची टक्केवारी वाढावी, या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या स्वीप (Systematic Voters' Education and Electoral Participation) कार्यक्रमांतर्गत चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात नाट्य रसिकांनी १५ जानेवारी रोजी १०० टक्के मतदान करण्याची शपथ घेत लोकशाहीप्रती आपली निष्ठा व्यक्त केली.



+ नाट्य रसिकांची १५ जानेवारीला १००% मतदानाची शपथ

'अथर्व सुदामे लाईव्ह...' या नाट्यप्रयोगाच्या वेळी आयोजित या विशेष मतदान जनजागृती उपक्रमात नाट्यप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आम्ही, भारताचे नागरिक, मुक्त, निःपक्षपाती आणि शांततापूर्ण वातावरणात निर्भयपणे मतदान करू, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता तसेच धर्म, जात, वंश, भाषा अथवा समाज यांच्या प्रभावाखाली न येता मतदान करू, अशी सामूहिक प्रतिज्ञा यावेळी घेण्यात आली. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली हा उपक्रम राबविण्यात आला. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य असल्याचा प्रभावी संदेश देण्यात आला. मनोरंजनासोबतच सामाजिक जाणीव जागृत करणाऱ्या या उपक्रमाचे नाट्य रसिकांनी विशेष कौतुक केले. सांस्कृतिक मंचाच्या माध्यमातून दिलेला मतदानाचा संदेश समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रभावी ठरत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. युवक, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

> "पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी रोजी होत आहे. शहरातील सर्व मतदारांनी १०० टक्के मतदान करून लोकशाहीने दिलेला पवित्र हक्क बजावत आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे."
>
> — अथर्व सुदामे, रिल स्टार व सुप्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर

## रुबी हॉल किडनी रॅकेट प्रकरणी अखेर वर्षभरानंतर चौकशी अहवाल सादर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** रुबी हॉल क्लिनिकमध्ये उघडकीस आलेल्या अवैध किडनी (मूत्रपिंड) प्रत्यारोपण रॅकेटप्रकरणी अखेर वर्षभरानंतर राज्य शासनाच्या चौकशी समितीचा अहवाल सादर करण्यात आला आहे. उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश न्या. संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या १० सदस्यीय चौकशी समितीने तब्बल ४७० पानी सविस्तर अहवाल आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे सादर केला आहे.

या अहवालात रुबी हॉल क्लिनिकमध्ये झालेल्या किडनी प्रत्यारोपण प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे किडनीदाता म्हणून दाखवण्यात आलेली महिला प्रत्यक्षात रुग्णाची पत्नी नसून बनावट नातेसंबंध दाखवून प्रत्यारोपण करण्यात आल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. रुग्णालय प्रशासन, संबंधित डॉक्टर, समन्वयक तसेच मध्यस्थांची भूमिका संशयास्पद असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. कागदपत्रांची बनावट, वैद्यकीय नियमांचे उल्लंघन आणि मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्याच्या तरतुदींचा भंग झाल्याचे पुरावे अहवालात समाविष्ट करण्यात आले आहेत. आता या अहवालाच्या आधारे दोषी व्यक्तींविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असून, नेमके कोण दोषी आहेत हे लवकरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे. या प्रकरणामुळे राज्यातील अवयव प्रत्यारोपण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आरोग्य विभाग पुढील निर्णय काय घेतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अजित पवार–रवींद्र धंगेकर भेटीनंतर राजकीय चर्चांना उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास केवळ एक दिवस शिल्लक असताना शहरातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रवींद्र धंगेकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची अचानक भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या भेटीनंतर पुण्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये युती होणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

निवडणुका जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात भाजप आणि शिवसेनेची युती होईल, असे जाहीर केले होते. मात्र, अद्याप महायुतीत जागावाटपावर एकमत झालेले नाही. भाजपकडून शिवसेनेला केवळ १५ जागांचा प्रस्ताव देण्यात आल्याची चर्चा असून, त्यामुळे शिवसेनेत नाराजी वाढल्याचे बोलले जात आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेकडून राष्ट्रवादी काँग्रेससोबत पर्यायी युतीची शक्यता तपासली जात असल्याचे संकेत मिळत आहेत.

आज सायंकाळी रवींद्र धंगेकर यांनी अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीत पुणे महापालिकेसाठी शिवसेनेच्या संभाव्य जागांचा प्रस्ताव अजित पवार यांच्यासमोर मांडण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास तासभर सविस्तर चर्चा झाली.


या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना धंगेकर यांनी स्पष्ट केले की, अजित पवारांनी युतीसाठी अद्याप कोणताही 'ग्रीन सिग्नल' दिलेला नाही. मात्र, आज रात्री दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते युतीबाबत चर्चा करण्यासाठी बसणार असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे पुण्याच्या राजकारणात मोठा राजकीय ट्विस्ट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## शिक्षक भरतीची जबाबदारी आता राज्य परीक्षा परिषदेकडे

### प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि एकसंध करण्यासाठी शिक्षण विभागाचा महत्त्वाचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेत शालेय शिक्षण विभागाने मोठा आणि निर्णायक बदल केला आहे. शिक्षक भरती परीक्षांचे आयोजन तसेच निवड प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि एकसंध पद्धतीने राबविण्यासाठी आता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे शिक्षक भरतीची संपूर्ण जबाबदारी सोपवण्यात येणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने प्रसिद्ध केला आहे.



सध्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षक भरती प्रक्रिया पवित्र (PAVITRA) प्रणालीच्या माध्यमातून राबवली जाते. २०१७ पासून ही प्रक्रिया शिक्षण आयुक्तालयामार्फत चालवली जात होती. मात्र, शिक्षण आयुक्तालयावर शालेय शिक्षण विभागाच्या विविध धोरणांची अंमलबजावणी, देखरेख आणि नियंत्रणाची मोठी जबाबदारी असल्याने शिक्षक भरतीसारखी वेळखाऊ व निरंतर प्रक्रिया हाताळताना इतर महत्त्वाच्या कामांवर परिणाम होत असल्याचे विभागाच्या निदर्शनास आले. शिक्षक पदभरतीमध्ये जाहिरात प्रसिद्ध करणे, शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीनंतर उमेदवारांसाठी स्व-प्रमाणीकरणाची सुविधा देणे, विषय व प्रवर्गनिहाय आरक्षण, सामाजिक व समांतर आरक्षणाचा विचार करणे, पात्रता गुण (कटऑफ) निश्चित करणे आणि अंतिम शिफारसी करणे असे अनेक टप्पे समाविष्ट असतात. ही प्रक्रिया अत्यंत काटेकोर आणि वेळखाऊ असल्याने शिक्षण आयुक्तालयाचा मोठा प्रशासकीय वेळ यासाठी खर्च होत होता.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही स्वायत्त संस्था असून ती आधीपासूनच शिक्षक पात्रता परीक्षा (TET) तसेच शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीचे आयोजन करते. यापूर्वीही शिक्षक भरतीसंबंधित कामकाज परिषदेमार्फत पार पडले असल्याने, परीक्षा आयोजन आणि निवड प्रक्रिया एकाच संस्थेकडे ठेवणे अधिक उपयुक्त ठरेल, असा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे.

दरम्यान, पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली आहे.

# पीसीएमसी निवडणुकीसाठी प्रसार माध्यम संनियंत्रण समिती कार्यान्वित

## जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन बंधनकारक; आचारसंहिता भंग, पेड न्यूजवर कठोर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रचारात प्रसारित होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक जाहिराती, सोशल मीडिया प्रचार तसेच इतर डिजिटल माध्यमांवरील जाहिरातींवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. निवडणूक काळात उमेदवार व राजकीय पक्षांकडून प्रसारित होणाऱ्या सर्व इलेक्ट्रॉनिक जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन घेणे बंधनकारक असल्याची माहिती समितीचे सदस्य सचिव किरण गायकवाड यांनी दिली.




महानगरपालिका निवडणुकीदरम्यान पेड न्यूज, द्वेषपूर्ण मजकूर, चुकीची माहिती तसेच निवडणूक आचारसंहितेचा भंग करणाऱ्या जाहिराती प्रसारित होऊ नयेत, यासाठी ही समिती कार्यरत आहे. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली समिती सर्व प्रकारच्या प्रसार माध्यमांवर सातत्याने देखरेख ठेवत असून कोणतीही जाहिरात समितीच्या पूर्वप्रमाणनाशिवाय प्रसारित करू नये, असे स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करणे उमेदवार व राजकीय पक्षांवर बंधनकारक राहणार आहे.

समितीचे मध्यवर्ती कार्यालय पिंपरी येथील पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील माहिती व जनसंपर्क विभागात कार्यान्वित करण्यात आले आहे. उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांच्या प्रस्तावित जाहिरातींच्या पूर्वप्रमाणनासाठी विहित वेळेत समितीकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. जाहिरात प्रसारित करण्यापूर्वी आवश्यक ती सर्व प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे असून, उशीर झाल्यास किंवा नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कारवाई होऊ शकते.

पूर्वप्रमाणनासाठी अर्जाचा नमुना तसेच आवश्यक कागदपत्रांची सविस्तर माहिती महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय ही माहिती क्यूआर कोडच्या माध्यमातूनही देण्यात आली असून, संबंधित क्यूआर कोड सर्व निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये बॅनर स्वरूपात लावण्यात आले आहेत. त्यामुळे उमेदवारांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध होणार आहे.

समितीकडे आलेल्या जाहिरातींची तपासणी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार करण्यात येईल. जाहिरातीत सुचवण्यात आलेले बदल, दुरुस्त्या किंवा वगळणे हे उमेदवार किंवा संबंधित राजकीय पक्षांवर बंधनकारक राहतील. सर्व निकष पूर्ण झाल्यानंतरच जाहिरातीस अधिकृत पूर्वप्रमाणन प्रमाणपत्र देण्यात येईल, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व नियमबद्ध राहावी, यासाठी समिती कठोरपणे कार्यरत राहणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये 'शक्तिस्थळ'चे १ जानेवारीला भव्य लोकार्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकीय व सामाजिक इतिहासात भावनिक आणि प्रेरणादायी क्षण ठरणारा प्रसंग लवकरच अनुभवायला मिळणार आहे. प्रेरणा, निष्ठा, सेवाभाव आणि दातृत्वाचे प्रतीक असलेले लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या 'शक्तिस्थळ' या प्रेरणा केंद्राचे भव्य लोकार्पण गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता पिंपळे गुरव गावठाण येथील मारुती मंदिराजवळ होणार आहे, अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली.

आमदार शंकर जगताप म्हणाले की, लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या दातृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्वाची ओळख संपूर्ण राज्यात होती. पिंपरी-चिंचवड शहर आधुनिक व सक्षम बनवण्याचा त्यांचा ध्यास होता. त्यांच्या विचारांचा, कार्याचा आणि सेवाभावाचा वारसा भावी पिढ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हे शक्तिस्थळ उभारण्यात आले आहे. हे केवळ स्मारक नसून, कार्यकर्ते आणि युवकांसाठी प्रेरणेचे केंद्र ठरणार आहे. 'शक्तिस्थळ'च्या लोकार्पणासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस प्रमुख उपस्थित राहणार असून, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, माधुरीताई मिसाळ, मंत्री डॉ. प्रा. तानाजीराव सावंत, माजी आमदार अश्विनीताई लक्ष्मणभाऊ जगताप यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

१५ गुंठे जागेत उभारलेल्या या शक्तिस्थळात लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या आठवणी, पुरस्कार व सन्मान जतन करण्यात आले आहेत. येथे ग्रंथालय, अभ्यासिका, ॲम्फी थिएटर, अखंड ज्योत आणि वृक्षारोपणाचा समावेश आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### चांडोह येथे बिबट मादी जेरबंद

**शिक्रापूर :** पिंपरखेड (ता. शिरूर) शेजारील चांडोह गाव परिसरात बिबट्याच्या सतत दर्शनामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. शिरूर वनविभागाने सोमवारी दोन बिबटे पकडल्यानंतर मंगळवारी सकाळी पत्रकार हेमंत चापुडे यांच्या शेतात लावलेल्या पिंजऱ्यात आणखी एक बिबट मादी अडकली. माहिती मिळताच वनअधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपथकाने बिबट्याला सुरक्षित ताब्यात घेतले.

### एनसीएलमध्ये स्व. निरंजन नेवकर जनजीवन सम्राट विजेता

**नारायणगाव :** नारायणगाव-वारुळवाडी येथे आयोजित नारायणगाव क्रिकेट लीग (एनसीएल)च्या दशकपूर्ती पर्वात स्व. निरंजन नेवकर जनजीवन सम्राट संघाने विजेतेपद पटकावले, तर लिट्ल मास्टर संघ उपविजेता ठरला. मुक्ताई विक्रांत वॉरियर तृतीय आणि अमर प्रतिष्ठान संघ चतुर्थ क्रमांकावर राहिला. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना सायकल व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

### मुळशी येथे रतन टाटा यांना अभिवादन

**पौड :** मुळशी धरण विभाग शिक्षण मंडळाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माले यांच्या वतीने रतन टाटा यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. रतन टाटा यांच्या दूरदृष्टीमुळे मुळशीच्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या. सेनापती बापट विद्यालयासाठी इमारत व पाच एकर जागा तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी आवश्यक भौतिक सुविधा त्यांनी उपलब्ध करून दिल्या. यावेळी प्राचार्य सुरेश बाबने बामणे यांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

## ४८ तासांत कारवाई; ५६ तोळे सोन्यासह ७० लाख ३२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

# दिवसा सशस्त्र दरोडा टाकणारी सराईत गुन्हेगारांची टोळी जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**ओतूर :** खानापूर (ता. हवेली) येथील सराफ दुकानावर भरदिवसा तलवार व कोयत्याच्या धाकाने सशस्त्र दरोडा टाकणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला पुणे ग्रामीण पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत जेरबंद केले आहे. या धडक कारवाईत सुमारे ५६ तोळे २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, दरोड्यात वापरलेला कोयता तसेच अन्य साहित्य असा एकूण ७० लाख ३२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्यासोबत तीन विधीसंघर्षित बालकांचा सहभाग उघड झाला आहे.

दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास पाच अनोळखी दरोडेखोरांनी खानापूर येथील वैष्णवी ज्वेलर्स या सराफ दुकानावर सशस्त्र दरोडा टाकला. दरोडेखोरांनी दुकानमालक व महिला कर्मचाऱ्यांना हत्याराचा धाक दाखवून सुमारे ८४ तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम, असा अंदाजे १ कोटी ५ लाख रुपयांचा मुद्देमाल लुटून पोबारा केला. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. याप्रकरणी दुकानमालकांच्या पत्नी राणी अमोल बाबर (वय २८) यांनी हवेली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल व अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांनी घटनास्थळी भेट देऊन तातडीने तपास यंत्रणा कार्यान्वित केली. स्थानिक गुन्हे शाखेची चार पथके तसेच हवेली व वेल्हे पोलीस ठाण्याची दोन पथके, अशी एकूण सहा तपास पथके तयार करण्यात आली. दरोडेखोर दरोड्यानंतर पानशेतच्या दिशेने पळाल्याची माहिती साक्षीदारांकडून मिळाल्याने त्या अनुषंगाने तपासाची दिशा ठरवण्यात आली.

तपासादरम्यान गुन्ह्यात दोन मोटारसायकलींचा वापर झाल्याचे निष्पन्न झाले. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे मोटारसायकलींचा मागोवा घेण्यात आला. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. दरोडेखोरांनी वेगवेगळ्या मार्गांनी वेल्हे तालुक्याच्या दिशेने पलायन केल्याची माहिती पुढे आली. सलग दोन दिवस दिवस-रात्र तपास करत असताना दरोडेखोर सिगापूर डोंगरातील जंगल परिसरात लपल्याचे स्पष्ट झाले.

गोपनीय बातमीदारांच्या माहितीच्या आधारे दि. २८ डिसेंबर रोजी अंकुश दगडू कचरे (वय २०, व्यवसाय ड्रायव्हर) व गणेश भाऊ कचरे (वय २३) या दोघांना सिगापूर डोंगरातील जंगलातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी तीन विधीसंघर्षित बालकांच्या मदतीने दरोडा टाकल्याची कबुली दिली. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेला कोयता तसेच ५६ तोळे २ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता ५ जानेवारी २०२६ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे. मुख्य आरोपी अंकुश कचरे याच्यावर यापूर्वीही शरीराविरुद्धचे तीन गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, हवेली व वेल्हे पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे पार पाडली. भरदिवसा सशस्त्र दरोडा टाकणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## राजेंद्र शिंदे राष्ट्रीय ज्ञानयज्ञ कलाभूषण पुरस्काराने सन्मानित



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** बनकरफाटा (प्रतिनिधी : रविंद्र भोर) : जुन्नर तालुक्यातील उदापूर गावचे सुपुत्र कु. राजेंद्र लक्ष्मण शिंदे यांना कोल्हापूर येथे आयोजित २६ व्या मराठी साहित्य संमेलनात राष्ट्रीय ज्ञानयज्ञ कलाभूषण पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कवी सरकार वाचन मंदिर व कवी सरकार स्वाभिमानी वाचनालय इंगळी यांच्या संयुक्त विद्यमाने करवीर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे हे संमेलन पार पडले. उत्कृष्ट निवेदक, ‘होम मिनिस्टर’ फेम कलाकार, वारकरी संप्रदायातील कार्य व चित्रपट क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी युवासेना प्रमुख विकास राऊत, सरपंच स्वप्निल आहिनवे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या सन्मानाबद्दल उदापूर ग्रामस्थ व जुन्नर तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पारगाव साखर शाळेत विद्यार्थ्यांसाठी मोफत केस कापणीचा स्तुत्य उपक्रम

### ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी द हेअर वर्ल्ड सलूनचा सामाजिक सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखाना स्थळावरील जिल्हा परिषद प्राथमिक साखर शाळेत दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांसाठी मोफत केस कापणी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून ऊसतोड कामगारांच्या २५ ते ३० विद्यार्थ्यांचे नीटनेटके केस कापून त्यांना स्वच्छ व शिस्तबद्ध स्वरूप देण्यात आले.

हा उपक्रम पारगाव येथील द हेअर वर्ल्ड सलूनचे गोकुळ देवडे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या सहकार्याने पार पडला. केस कापणीसोबतच त्यांनी विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. केसांची नियमित निगा कशी राखावी, तेल लावण्याचे योग्य प्रमाण काय असावे तसेच स्वच्छतेचा आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम याविषयी त्यांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली. या सामाजिक उपक्रमाचे भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी विशेष कौतुक केले. समाजातील गरजू घटकांसाठी राबविण्यात येणारे असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात, असे त्यांनी नमूद करत गोकुळ देवडे व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमास माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे, साखर शाळेच्या शिक्षिका वर्षा लबडे, कारखान्याचे सुरक्षा अधिकारी कैलास गाढवे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थी, पालक तसेच शिक्षक वर्गात समाधान व्यक्त करण्यात आले.



## दुधाचा टँकर-पिकअप भीषण अपघात; दोन मजूर महिलांचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर डुंबरवाडी (ता. जुन्नर) येथे मंगळवारी सकाळी सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास दुधाच्या टँकर आणि मजुरांनी भरलेल्या पिकअप जीपमध्ये झालेल्या भीषण अपघातात दोन मजूर महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर तब्बल २५ जण जखमी झाले. या अपघाताने परिसरात एकच खळबळ उडाली असून महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

या अपघातात मंदा शिवराम हिलम (वय ४०, रा. तळेगाव, ता. मुरबाड, जि. ठाणे) आणि वंदना गणेश हिलम (वय २५, रा. खुटल, ता. मुरबाड, जि. ठाणे) या दोन मजूर महिलांचा जागीच मृत्यू झाला. या महिला पिकअप जीपमधून कामासाठी जात असताना हा अपघात झाला. मजुरांनी भरलेली पिकअप जीप (क्र. एम.एच. १६ सी.डी. ८१५५) ही ओतूरकडून आळेफाट्याच्या दिशेने जात होती. त्याच वेळी समोरून येणाऱ्या दुधाच्या टँकरला (क्र. एम.एच. १२ एक्स.एम. ६१२१) डुंबरवाडी जवळ समोरासमोर जोरदार धडक बसली.

धडकेचा जोर इतका प्रचंड होता की पिकअप जीपचा पुढील भाग पूर्णपणे चुरगळला गेला. पिकअपमध्ये बसलेले मजूर एकमेकांवर आदळल्याने अनेकांना गंभीर दुखापती झाल्या. अपघातानंतर घटनास्थळी हाहाकार उडाला. रस्त्यावर रक्ताचे थारोळे साचले होते, तर जखमी मदतीसाठी आक्रोश करत होते.

या अपघातात दिपाली संदीप साबळे, शुभांगी साबळे, सोनाबाई नारायण भोईर, ढवळाबाई पोपट मुकणे, सुवर्णा दराडे, तुळसाबाई नाथा साबळे, ताईबाई दावजी हगवणे, कुसुम महेंद्र भोईर, पुष्पा नितीन वाघ, मारुती वाघ, नितीन शंकर गोडे, संगीता पांडुरंग मोडक, सुनीता छबु कोकणे, वनिता गणपत गोडे, दर्शना वाघ, योगिता हरीश भोईर, स्वाती संजय भोईर, शैला रामदास बगाड, कलाबाई महादू भोईर, छाया संताजी नाडेकर, जयश्री प्रवीण बगाड, मंगल सिताराम भोईर, हसाबाई दत्तात्रय भवारी, वैशाली संतोष गोंदके, अरुणा पांडुरंग बगाड यांच्यासह दुधाच्या टँकरचा चालक संजय चव्हाण हे जखमी झाले आहेत. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव यांच्यासह पोलीस हवालदार देविदास खेडकर, सुरेश गेंगजे, धनंजय पालवे, विलास कोंढावरे, मनोज राठोड, रोहित बोंबले, विशाल गोडसे, श्याम जायभाये, ज्योतीराम पवार आदींनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना रुग्णवाहिकेतून ओतूर, आळेफाटा व मंचर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. अपघातग्रस्त वाहने बाजूला काढून महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली.

या अपघातप्रकरणी विशाल साबळे व अशोक पावडे यांनी ओतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून संबंधित वाहनचालकांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक लहु थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

दरम्यान, शिवजन्मभूमी जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके यांनी घटनास्थळी भेट देऊन अपघाताची माहिती घेतली.

## दिलीप महाराज ठाकरे यांचा राष्ट्रीय आदर्श वारकरी संप्रदाय भूषण पुरस्काराने गौरव!




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ ४० वर्षांच्या समाजप्रबोधनात्मक कार्याची दखल; कोल्हापुरात भव्य समारंभात सन्मान**

**आळंदी :** तीर्थक्षेत्र आळंदी येथील नर्मदा परिक्रमा परिवाराचे मार्गदर्शक, राष्ट्रीय कीर्तनकार तथा समाजप्रबोधनकार ह. भ. प. दिलीप महाराज ठाकरे यांना राष्ट्रीय आदर्श वारकरी संप्रदाय भूषण पुरस्कार २०२५ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. भगवान पांडुरंग परमात्म्याच्या शुभ संकल्पनेने आणि सद्गुरू राजाराम महाराज शास्त्री झेंडूजी महाराज परंपरेच्या कृपेने हा गौरव कोल्हापूर येथील छत्रपती शाहू महाराज सभागृहात आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात आला.

ह. भ. प. दिलीप महाराज ठाकरे हे वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार, प्रवचनकार असून गेल्या ४० वर्षांपासून भजन, काकडा, गायन, मृदंग वादन यांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य करीत आहेत. शेकडो कीर्तन व प्रवचनांच्या माध्यमातून त्यांनी समाजात नैतिक मूल्ये, सामाजिक सलोखा आणि धार्मिक श्रद्धा रुजवण्याचे मोलाचे कार्य केले आहे. त्यांच्या कीर्तनातून केवळ अध्यात्मिक संदेशच नव्हे, तर सामाजिक जाणीव जागृत करणारा प्रभावी विचार प्रवाहित होत असतो.

दिलीप महाराज ठाकरे यांनी आपल्या कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचेही उल्लेखनीय कार्य केले आहे. सामाजिक बांधिलकी जपत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. आळंदी पंचक्रोशीपुरतेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात ते एक अभ्यासू, सामाजिक भान जपणारे कीर्तनकार म्हणून परिचित आहेत.

महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा, वारकरी संप्रदायाचे विचार आणि संतपरंपरेचे मूल्य समाजात रुजवण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत त्यांना हा राज्यस्तरीय सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

## रांजणी येथे नरसिंह-साईनाथ पतसंस्थांचे प्रशिक्षण शिबिर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी येथे महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे, श्री नरसिंह नागरी सहकारी पतसंस्था रांजणी व श्री साईनाथ नागरिक सहकारी पतसंस्था मंचर यांच्या संयुक्त विद्यमाने संचालक व सेवकांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सहकारी संस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध व परिणामकारक करण्याबरोबरच सेवकांच्या कार्यक्षमतेत वाढ घडवून आणणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता.

प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी श्री नरसिंह पतसंस्थेचे माजी अध्यक्ष व मार्गदर्शक संतोष वाघ, श्री साईनाथ पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप मिश्रा, सहादू घायतडके, श्री नरसिंह पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र वाघ यांच्यासह दोन्ही संस्थांचे संचालक व सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ भूषण खैरनार यांनी “ठेवीवाढ व सेवक कार्यक्षमता वाढ” या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. ठेवी वाढीसाठी प्रभावी उपाययोजना, ग्राहकांशी विश्वासाचे नाते निर्माण करणे, आधुनिक बँकिंग पद्धतींचा योग्य वापर, तसेच सेवकांनी जबाबदारीने व सक्षमपणे काम कसे करावे, यावर त्यांनी भर दिला. ग्राहकाभिमुख सेवा, वेळेचे नियोजन, संवाद कौशल्य व टीमवर्क या बाबी सेवकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यानंतर गणेश राऊत यांनी नेटवीन सॉफ्टवेअर व क्यूआर कोड प्रणालीबाबत सखोल माहिती दिली. आर. पी. बचाटे यांनी कर्जवाटपातील आवश्यक कागदपत्रे व वसुली प्रक्रियेविषयी उपयुक्त मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा दैनंदिन कामकाजात निश्चित उपयोग होईल, अशी प्रतिक्रिया उपस्थित संचालक व सेवकांनी व्यक्त केली. या शिबिरामुळे सहकारी संस्थांचे आर्थिक स्थैर्य वाढण्यास तसेच सेवकांच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र वाघ यांनी व्यक्त केला.

## सोलापूर हायवेवर रात्री प्रवाशांवर हल्ले २.६३ लाखांचा ऐवज लुटला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड :** पुणे-सोलापूर महामार्गावर रात्री विश्रांतीसाठी साईडला थांबलेल्या चारचाकी गाड्यांना लक्ष्य करत अज्ञात चोरट्यांनी दरोडे टाकल्याच्या दोन घटना घडल्या. पहिली घटना कुरकुंभ पोलीस ठाणे हद्दीत पहाटे तीनच्या सुमारास घडली. देवदर्शन करून पुण्याकडे येणाऱ्या कुटुंबाच्या गाडीची काच फोडून बंदुकीचा धाक दाखवत महिलेकडील १ लाख ७५ हजारांचे सोन्याचे दागिने लुटण्यात आले. दुसरी घटना यवत पोलीस ठाणे हद्दीतील वाखारी येथे रात्री दोनच्या सुमारास घडली असून तेथे ८८ हजारांचे मंगळसूत्र हिसकावून नेण्यात आले. दोन्ही घटनांत तीन चोर, समान पद्धत आणि साईड रस्त्यावर थांबलेल्या गाड्या हे साम्य असल्याने एखादी लुटारू टोळी सक्रिय असल्याचा संशय व्यक्त होत आहे. या घटनांमुळे महामार्गावरील प्रवासी भयभीत झाले असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## निधन वार्ता

### दगडू तळोले यांचे निधन



**शिक्रापूर :** कान्हूर मेसाई (ता. शिरूर) येथील जुन्या पिढीतील ज्येष्ठ नागरिक दगडू बन्सी तळोले (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. गावच्या सामाजिक व विकासकामांमध्ये त्यांचा मोलाचा सहभाग होता. परिसरात ते प्रेमाने ‘दगडूकाका’ या नावाने परिचित होते. दगडू तळोले यांनी आयुष्यभर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान दिले. शांत, मनमिळावू स्वभाव आणि सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा परिसरात मोठा सन्मान होता. त्यांच्या निधनाने कान्हूर मेसाई गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात भाऊ, भावजय, एक मुलगा, दोन मुली, पुतणे, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे. जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निर्मला पानसरे यांचे ते चुलते होत. तसेच शिवव्याख्याते प्राचार्य अनिल शिंदे यांचे ते सासरे, आदर्श शिक्षिका मंगल शिंदे, गुनाट ग्रामपंचायतीच्या सरपंच सुनंदा करपे आणि आदर्श शिक्षक गुलाब तळोले यांचे ते वडील होत. त्यांच्या जाण्याने सामाजिक, शैक्षणिक व कौटुंबिक क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, अनेक मान्यवरांनी तळोले कुटुंबीयांची भेट घेऊन शोकसंवेदना व्यक्त केल्या.

## २०८ व्या शौर्यदिनाची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात; तिरंग्यातील आगळीवेगळी फुलांची सजावट

# कोरेगाव भीमातील विजयस्तंभ सजावटीने उजळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा, ता. शिरुर तसेच पेरणे फाटा परिसरात १ जानेवारी २०२६ रोजी साजऱ्या होणाऱ्या २०८ व्या शौर्यदिनाच्या पार्श्वभूमीवर ऐतिहासिक विजयस्तंभाची आकर्षक सजावट अंतिम टप्प्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विजयस्तंभाला भव्य, देखणी आणि अर्थपूर्ण स्वरूपाची सजावट करण्यात येत असून यासाठी प्रशासन, विविध संस्था आणि सजावट समिती युद्धपातळीवर काम करत आहेत.

तब्बल ७५ फूट उंच असलेल्या या ऐतिहासिक विजयस्तंभाची सजावट जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या नियंत्रणाखालील समितीच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. सजावटीपूर्वी अग्निशामक बंबांच्या सहाय्याने संपूर्ण विजयस्तंभ स्वच्छ पाण्याने धुवून घेण्यात आला. त्यानंतर स्तंभावर तिरंग्याच्या रंगसंगतीतील फुलांची अत्यंत आकर्षक आणि नियोजनबद्ध सजावट करण्यात आली आहे.

यंदाच्या सजावटीत विशेष आकर्षण म्हणजे पंचशीलाच्या चौकटीत साकारण्यात आलेली रचना. यात दोन ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य फोटो, तसेच दोन राजमुद्रा लावण्यात आल्या आहेत. त्यासोबतच “न्याय” आणि “स्वातंत्र्य” ही प्रेरणादायी वाक्ये आणि तिरंगा ध्वज यांचा सुंदर संगम साधण्यात आला आहे. या सजावटीतून शौर्य, समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचे प्रतीक प्रभावीपणे अधोरेखित केले आहे. शौर्यदिनाच्या कार्यक्रमासाठी प्रशासनाने वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा याबाबत विशेष नियोजन केले आहे.

**विजयस्तंभ सजावट - ठळक वैशिष्ट्ये**

- २०८ वा शौर्यदिन : १ जानेवारी २०२६
- ऐतिहासिक विजयस्तंभाची उंची : ७५ फूट
- सजावट : तिरंग्यातील आकर्षक फुलांची रचना
- विशेष संकल्पना : पंचशील चौकट
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे २ भव्य फोटो
- २ राजमुद्रा व “न्याय” - “स्वातंत्र्य” प्रेरणादायी संदेश
- सजावटीपूर्वी अग्निशामक बंबांनी संपूर्ण स्वच्छता

## सारांश वृत्त

### भाजपाला ५० जागाही मिळणार नाहीत

**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर प्रत्युत्तर देत त्यांच्यावर खोटेपणा पसरवण्याचा आणि २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत दोन तृतीयांश बहुमत मिळवण्याचे निराधार दावे करण्याचा आरोप केला. ज्येष्ठ तृणमूल काँग्रेस नेते आणि राज्याचे शिक्षण मंत्री ब्रात्य बसू यांनी पत्रकारांना सांगितले की, शाह यांचे वक्तव्य पोकळ दाव्यांवर आधारित आहे आणि त्यांनी असा दावा केला की, निवडणुकीत भाजप ५० जागांचा आकडाही ओलांडू शकणार नाही, असे बसू यांनी एका कार्यक्रमादरम्यान सांगितले.

### भीषण आगीत दुकाने जळून खाक

**कोची :** येथील ब्रॉडवेच्या व्यावसायिक रस्त्यावर मंगळवारी रात्री काही वेळातच भीषण आग लागली, ज्यामुळे अनेक दुकाने जळून खाक झाली. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले की, खेळणी आणि शोभेच्या वस्तू विकणारी किमान पाच दुकाने आगीत पूर्णपणे खाक झाली आहेत. आगीची माहिती मिळताच येथील नऊ अग्निशमन केंद्रांमधील बारा अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या.



### टोलनाक्यावर कर्मचाऱ्यांवर हल्ला; दोघांना अटक


**कोलकाता :** पु मंगळुरू (कर्नाटक) टोल प्लाझा कर्मचाऱ्यांवर झालेल्या कथित हल्ल्या आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी पोलिसांनी दोन जणांना अटक केल्याचे सांगितले. कासारगोड जिल्ह्यातील मुल्लेरिया येथील रहिवासी प्रशांत बी (२५) यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरून २९ डिसेंबर रोजी पहाटे बंटवाल तालुक्यातील ब्रह्मराकूटलू टोल गेटवर ही घटना घडली. प्रशांत टोल इन्चार्ज म्हणून ड्युटीवर होते तेव्हा रस्त्याच्या चुकीच्या बाजूने एक लॉरी टोल गेटजवळ आली असा आरोप आहे.

---

### अधिररंजन चौधरी यांनी घेतली पंतप्रधानांची भेट

# बंगाली भाषकांवरील हल्ल्यांची काँग्रेसी चिंता

दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन देशाच्या विविध भागात, विशेषतः भाजपशासित राज्यांमध्ये बंगाली भाषिक लोकांवर होणाऱ्या कथित हल्ल्यांचा मुद्दा उपस्थित केला. अशा घटनांमुळे पश्चिम बंगालमध्ये जातीय तणाव आणि हिंसाचार वाढू शकतो, असे सांगून त्यांनी पंतप्रधानांनी त्वरित हस्तक्षेप करण्याची मागणी केली.

पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात चौधरी यांनी म्हटले आहे की बंगाली भाषिक स्थलांतरित कामगारांचा एकमेव गुन्हा म्हणजे ते बंगाली बोलतात, ज्यामुळे अनेक ठिकाणी अधिकारी चुकून असे गृहीत धरतात की ते शेजारच्या बांगलादेशातून आलेले बेकायदेशीर स्थलांतरित आहेत. त्यांनी आरोप केला की या गैरसमजामुळे बंगाली भाषिक लोकांचा छळ होत आहे आणि त्यांचा छळ होत आहे.

चौधरी यांनी पत्रात असेही नमूद केले आहे की पश्चिम बंगालमधील अनेक भाग मुस्लिम बहुल आहेत आणि बांगलादेशशी सीमा सामायिक करतात. इतर राज्यांमध्ये बंगाली भाषिक लोकांविरुद्धच्या कारवाईमुळे या सीमावर्ती भागात समुदायांमधील तणाव वाढत आहे. त्यांनी इशारा दिला की जर परिस्थिती त्वरित हाताळली गेली नाही तर राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ शकते. देशाच्या विविध भागातील स्थलांतरित कामगारांना कोणत्याही प्रकारचा भेदभाव, हिंसाचार किंवा छळ सहन करावा लागू नये यासाठी सर्व राज्य सरकारांना संवेदनशील करण्याचे निर्देश देण्याचे आवाहन काँग्रेस नेत्याने पंतप्रधानांना केले. भारताची विविधता ही त्याची ताकद आहे आणि भाषा किंवा प्रदेशाच्या आधारावर कोणत्याही नागरिकावर अन्याय अस्वीकार्य आहे यावर चौधरी यांनी भर दिला.

दरम्यान, अलिकडच्या घटनांमुळे हा प्रश्न आणखी वाढला आहे. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील जांगीपूर भागातील ३० वर्षीय स्थलांतरित कामगार ज्वेल राणा यांची ओडिशातील संबलपूर येथे बिडीवरून झालेल्या वादातून हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे. त्याचप्रमाणे, बांगलादेशातून आलेले बेकायदेशीर स्थलांतरित असल्याच्या संशयावरून मुंबईत दोन स्थलांतरित कामगारांना अटक करण्यात आली आहे.

पश्चिम बंगाल स्थलांतरित कल्याण मंडळाने असा दावा केला आहे की गेल्या १० महिन्यांत त्यांना देशाच्या विविध भागांमधून बंगाली भाषिक स्थलांतरित कामगारांच्या छळाशी संबंधित १,१४३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी बहुतेक तक्रारी भाजपशासित राज्यांशी संबंधित असल्याचे म्हटले जाते. या घटनांबाबत काँग्रेसने केंद्र सरकारला प्रश्न उपस्थित केला आहे, असे म्हटले आहे की स्थलांतरित कामगारांची सुरक्षा आणि सन्मान सुनिश्चित करणे ही सरकारची संवैधानिक जबाबदारी आहे. पक्षाने जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची आणि देशातील कुठेही कोणत्याही नागरिकाशी भाषा किंवा ओळखीच्या आधारे भेदभाव केला जाऊ नये अशी मागणी केली आहे.

---

# दिल्ली विमानतळाचे कामकाज दाट धुक्यामुळे विस्कळित

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दाट धुक्यामुळे इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील कामकाजात गंभीर विस्कळीतता निर्माण झाली, ज्यामुळे ११८ उड्डाणे रद्द करण्यात आली, १६ सेवा वळवण्यात आल्या आणि १३० हून अधिक उड्डाणांना विलंब झाला.

अधिकाऱ्यांच्या मते, कमी दृश्यमानतेमुळे ६० आगमन आणि ५८ प्रस्थान रद्द करण्यात आले, तर १६ उड्डाणे इतर विमानतळांवर वळवावी लागली. फ्लाइट ट्रॅकिंग प्लॅटफॉर्म फ्लाइटराडार२४ वरील डेटावरून असे दिसून आले की प्रस्थानांना सरासरी २८ मिनिटे विलंब झाला.

एक्स वरील एका निवेदनात, दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने स्पष्ट केले की सर्व उड्डाण ऑपरेशन्स सुरू असताना, नियमांचे पालन न करणाऱ्या सेवा, कमी दृश्यमानतेमध्ये विमान सुरक्षितपणे उतरवण्याची परवानगी देणारी उपकरणे, व्यत्यय आणू शकतात. आव्हानात्मक हवामान परिस्थितीत, नागरी उड्डाण मंत्रालयाने विमान कंपन्यांना प्रवासी सुविधा मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

या उपाययोजनांमध्ये वेळेवर उड्डाण अद्यतने प्रदान करणे, उशीर झालेल्या प्रवाशांसाठी जेवणाची व्यवस्था करणे, रद्द केल्यास पुन्हा बुकिंग किंवा परतफेड करणे, वेळेवर चेक इन करणाऱ्या प्रवाशांना बोर्डिंग नाकारले जाणार नाही याची खात्री करणे, सामान सेवा सुलभ करणे आणि प्रवाशांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करणे यांचा समावेश आहे.

---

# अरुणाचल प्रदेश हा भारताचा भाग

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भाजप नेते तापीर गाओ यांनी अरुणाचल प्रदेशवरील चीनचा दावा फेटाळून लावत म्हटले आहे की, तो भारताचा अविभाज्य भाग आहे आणि नेहमीच राहील. हे लक्षात घेतले पाहिजे की चीनने अरुणाचलला वारंवार दक्षिण तिबेट म्हटले आहे.

गाओ म्हणाले, चीन अरुणाचलला दक्षिण तिबेट म्हणतो, परंतु भारताने नेहमीच ते भारताचा अविभाज्य भाग असल्याचे म्हटले आहे. अरुणाचल कधीही तिबेटचा भाग नव्हता. १४ व्या दलाई लामांनीही हे अनेक वेळा सांगितले आहे. ते म्हणतात की एक दिवस चीनला तिबेट मुक्त करावे लागेल, असे त्यांनी म्हटले.

गाओ म्हणाले की बांगलादेशनेही आपले नापाक हेतू सोडून द्यावेत. ते ईशान्य भारतात विस्तार करू इच्छितात. परंतु भारत सध्या नरेंद्र मोदींच्या सरकारच्या अधीन आहे. त्यांचे संपूर्ण लक्ष बांगलादेश आणि म्यानमारमधून येणाऱ्या घुसखोरांवर आहे. ते म्हणाले की बांगलादेश ईशान्येकडे प्रवेश करण्याचे स्वप्न पाहत आहे. त्यांनी हे विसरू नये की आपण चिकन नेकचा विस्तार २२ किलोमीटरने केला आहे आणि आता तो चितगाव टेकडीपर्यंत पोहोचला आहे. आजचा भारत काहीही करू शकतो. आपल्याला भारतात घुसलेल्या बेकायदेशीर बांगलादेशी आणि रोहिंग्यांना परत पाठवावे लागेल, असे ते म्हणाले. माजी राजनयिक केपी फिब्यान यांनी असेही म्हटले आहे की चीन अरुणाचल प्रदेशवर हुक किंवा फसवणूक करून कब्जा करू इच्छित आहे आणि म्हणूनच तो त्याला दक्षिण तिबेट म्हणतो. पेंटागॉनने असेही म्हटले आहे की चीन अरुणाचल प्रदेशला तिबेटचा भाग मानतो. चियांग काई-शेकच्या सरकारचा उल्लेख करताना ते म्हणाले की ही विचारसरणी अलीकडेच उदयास आली नाही तर ती खूप जुनी आहे. चीन विस्तारवादी होता, हे भारताने लक्षात ठेवावे, असेही ते म्हणाले.

---

# अश्लील मजकुरावर कारवाई करा अन्यथा...

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने ऑनलाइन प्लॅटफॉर्मना, प्रामुख्याने सोशल मीडिया कंपन्यांना, अश्लील, अश्लील, बालविवाह आणि इतर प्रकारच्या बेकायदेशीर सामग्रीवर कारवाई न केल्यास कायदेशीर परिणामांचा इशारा दिला आहे.

२९ डिसेंबर २०२५ रोजीच्या एका सल्लागारात, इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालयाने सोशल मीडिया कंपन्यांना त्यांच्या अनुपालन चौकटीचा तात्काळ आढावा घेण्यास आणि त्यांच्या प्लॅटफॉर्मवरील अश्लील आणि बेकायदेशीर सामग्रीविरुद्ध कारवाई करण्यास सांगितले, अन्यथा त्यांना देशाच्या कायद्यानुसार खटला भरावा लागू शकतो. सोशल मीडिया मध्यस्थांसह मध्यस्थांना आठवण करून दिली जाते की त्यांच्या प्लॅटफॉर्मवर किंवा त्याद्वारे अपलोड केलेल्या, प्रकाशित केलेल्या, होस्ट केलेल्या, शेअर केलेल्या किंवा प्रसारित केलेल्या तृतीय-पक्षाच्या माहितीच्या बाबतीत दायित्वापासून सूट मिळविण्यासाठी आयटी कायद्याच्या कलम ७९ अंतर्गत ते कायदेशीररित्या कर्तव्यदक्षतेचे पालन करण्यास बांधील आहेत, असे यात म्हटले आहे.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने दिलेल्या सूचनांचे पालन करून ही सूचना देण्यात आली आहे, ज्यामध्ये असे आढळून आले आहे की सोशल मीडिया प्लॅटफॉर्म अश्लील, अश्लील, अनुचित आणि बेकायदेशीर सामग्रीवर कठोरपणे कारवाई करत नाहीत. आयटी कायदा आणि/किंवा आयटी नियम, २०२१ च्या तरतुदींचे पालन न केल्यास मध्यस्थ, प्लॅटफॉर्म आणि त्यांच्या वापरकर्त्यांविरुद्ध आयटी कायदा, बीएनएस आणि इतर लागू फौजदारी कायद्यांअंतर्गत खटला चालवण्यासह परिणाम होऊ शकतात, याचा पुनरुच्चार केला जातो. सोशल मीडिया कंपन्यांना आयटी कायदा आणि आयटी नियम २०२१ च्या तरतुदींची आठवण करून देण्यात आली आहे. त्यानुसार ऑनलाइन प्लॅटफॉर्मना त्यांच्या संगणक संसाधनांचे वापरकर्ते अश्लील, अश्लील, बालरोगप्रतिबंधक, मुलांसाठी हानिकारक किंवा अन्यथा बेकायदेशीर असलेली कोणतीही माहिती होस्ट, प्रदर्शित, अपलोड, सुधारित, प्रकाशित, प्रसारित, संग्रहित, अद्यतनित किंवा सामायिक करणार नाहीत, याची खात्री करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

आयटी कायदा आणि माहिती तंत्रज्ञान अंतर्गत विहित केलेल्या अश्लील, बालरोगप्रतिबंधक, मुलांसाठी हानिकारक किंवा अन्यथा बेकायदेशीर असलेल्या सामग्रीची ओळख पटवणे आणि त्वरित काढून टाकणे या संदर्भात, योग्य ती काळजी घेण्याच्या जबाबदाऱ्यांचे पालन करण्यात सुसंगतता आणि कठोरता आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

---

# केजरीवालांचा शिशमहल आता पटलावर

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री असताना अरविंद केजरीवाल यांनी जो बंगला बांधला, त्याला शिशमहल असे संबोधले जाते. कोट्यवधी रुपये खर्चुन त्यांनी तो सजवला. केजरीवाल यांचे हे निवासस्थान पुन्हा एकदा गोंधळ उडवणार आहे. दिल्ली सरकार विधानसभेत शिशमहल अहवालासह तीन कॅग अहवाल सादर करणार आहे. त्याशिवाय, रेखा गुप्ता सरकारने प्रदूषणाबाबत ठराव जाहीर केला आहे. या ठरावात गेल्या २० वर्षांतील सरकारांच्या कामगिरीवरही चर्चा केली जाईल आणि या मुद्द्यावरही गोंधळ होण्याची अपेक्षा आहे. दिल्लीचे मंत्री कपिल मिश्रा यांनी आगामी अधिवेशनाबद्दल अनेक तपशील सांगितले.

ते म्हणाले की दिल्ली विधानसभेचे अधिवेशन ५ जानेवारीपासून सुरू होईल. चार दिवसांच्या अधिवेशनात दिल्ली सरकार दोन ते तीन प्रस्ताव मांडेल. मंत्रिमंडळाने प्रदूषणावर चर्चा करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकार असे प्रस्ताव मांडेल ज्यावर सर्व सदस्य चर्चा करतील. दिल्लीतील प्रदूषणाची सध्याची स्थिती, त्याची कारणे, मागील सरकारांनी सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांची स्थिती, शास्त्रज्ञांनी सादर केलेले अहवाल, सरकारांच्या जबाबदाऱ्या, गेल्या २० वर्षांचा लेखाजोखा आणि सध्याची परिस्थिती हे सर्व सादर केले जाईल. मी माझ्या विरोधी सहकाऱ्यांनाही त्यांच्या सरकारच्या कृतींचा तपशील विधानसभेत आणण्याचे आवाहन करतो. आम्ही उणीवा आणि प्रदूषण दूर करण्यासाठी काय करता येईल यावर उघडपणे चर्चा करू, असे ते म्हणाले.

दिल्ली सरकारचे कायदामंत्री कपिल मिश्रा यांनीही शिशमहालसह तीन कॅग अहवाल सादर करण्याबद्दल सांगितले. मागील सरकारच्या काळात सादर केलेला कॅग अहवाल मागील मुख्यमंत्र्यांनी रोखून धरला होता. आम्ही सर्व अहवाल मांडण्याचा संकल्प केला होता. येत्या अधिवेशनात शीश महालवरील कॅग अहवाल विधानसभेत मांडला जाईल. दिल्ली जल बोर्डाच्या कामकाजाचा एक अतिशय तपशीलवार अहवाल आहे, जो देखील मांडला जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

---

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा दावा

# बंगालच्या सीमा सील करणार

दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** भारतीय जनता पक्षाने २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी बिगुल वाजवला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तृणमूल काँग्रेस सरकारला घुसखोरीचे सरकार असे संबोधले. ते म्हणाले की बंगालला अशा सरकारची आवश्यकता आहे, जे सीमा सील करू शकेल. ते सोमवारी रात्री कोलकाता येथे पोहोचले, जिथे त्यांनी पक्षाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.

अमित शाह म्हणाले की, बंगालमध्ये एप्रिलमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. बंगालमधील जनता भय, भ्रष्टाचार, कुशासन आणि घुसखोरी याऐवजी विकास, वारसा आणि गरिबांच्या कल्याणावर आधारित मजबूत सरकार आणण्याचा दृढनिश्चयी आहे. टीएमसीच्या १५ वर्षांच्या राजवटीत, बंगालमधील लोक दमदाटी, भ्रष्टाचार, कुशासन आणि विशेषतः घुसखोरीमुळे भयभीत आहेत. आम्ही बंगालमधील लोकांना आश्वासन देऊ इच्छितो आणि त्यांना वचन देऊ इच्छितो की, पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली बंगालमध्ये भाजप सरकार स्थापन झाल्यानंतर, आम्ही या ठिकाणाचा वारसा पुनरुज्जीवित करू, विकासाची गंगा पुन्हा वेगाने वाहेल आणि आम्ही गरिबांच्या कल्याणाला प्राधान्य देऊ, असे आश्वासन त्यांनी दिले.

ते म्हणाले, बंगालच्या सीमेवरून होणारी घुसखोरी हा फक्त बंगालचा प्रश्न नाही; तो राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न आहे. जर आपल्याला देशाच्या संस्कृतीचे रक्षण करायचे असेल आणि तिची सुरक्षा सुनिश्चित करायची असेल, तर आपल्याला बंगालच्या सीमा सील करणारे सरकार स्थापन करावे लागेल. तृणमूल काँग्रेस हे करू शकत नाही; फक्त भाजपच करू शकते, असे ते म्हणाले. १४ वर्षांपासून, भय आणि भ्रष्टाचार हे बंगालचे वैशिष्ट्य राहिले आहे. १५ एप्रिल २०२६ नंतर, जेव्हा भाजप बंगालमध्ये सरकार स्थापन करेल, तेव्हा आम्ही बंग गौरव, बंग संस्कृतीचे पुनरुज्जीवन आणि त्याचे पुनरुज्जीवन सुरू करू. विवेकानंद, बंकिम बाबू, गुरुदेव टागोर आणि श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या स्वप्नांचा बंगाल निर्माण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू, असेही त्यांनी सांगितले.

गृहमंत्री म्हणाले, २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत आम्हाला बंगालमध्ये १७ टक्के मते आणि दोन जागा मिळाल्या. २०१६ च्या विधानसभा निवडणुकीत आम्हाला १० टक्के मते आणि तीन जागा मिळाल्या. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत आम्हाला ४१ टक्के मते आणि १८ जागा मिळाल्या. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत आम्हाला ३८ टक्के मते आणि ७७ जागा मिळाल्या. फक्त तीन जागा जिंकणाऱ्या पक्षाने पाच वर्षांत ७७ जागा जिंकल्या. बंगालमध्ये ज्या काँग्रेसची स्थापना सुरू झाली, ती शून्यावर आली आणि ३४ वर्षे राज्य करणाऱ्या कम्युनिस्ट आघाडीलाही एकही जागा जिंकता आली नाही, ज्यामुळे आम्ही मुख्य विरोधी पक्ष राहिलो, असा दावा त्यांनी केला.

---

# बांगलादेशाच्या खालिदा झिया यांचे निधन

दैनिक राज्य लोकतंत्र



**ढाका :** बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. त्यांना भारतविरोधी बांगलादेशी नेत्या मानले जात असे, परंतु त्यांचे भारताशी जवळचे नाते होते. त्यांचा जन्म १९४५ मध्ये जलपाईगुडी येथे झाला होता. तो आता पश्चिम बंगाल राज्याचा भाग आहे.

दरम्यान, पूर्व बंगाल पाकिस्तानचा भाग बनला आणि त्यानंतर १६ डिसेंबर १९७१ रोजी स्वातंत्र्यानंतर बांगलादेश अस्तित्वात आला. अशाप्रकारे, खालिदा झिया या भारत, पाकिस्तान आणि नंतर बांगलादेश अशा तीन देशांच्या नागरिक ठरल्या. त्या बांगलादेशातील एक सर्वोच्च नेत्या बनल्या आणि पंतप्रधानपद भूषवणाऱ्या पहिल्या महिला बनल्या. फाळणीनंतर खालिदा झिया यांचे कुटुंब दिनाजपूर येथे स्थलांतरित झाले. १९९१ पासून, खालिदा झिया यांनी तीन वेळा पंतप्रधान म्हणून बांगलादेशाचे नेतृत्व केले.

१९८१ च्या उठावादरम्यान ज्यांची हत्या करण्यात आली होती, त्या माजी राष्ट्रपती झियाउर रहमान यांच्याशी त्यांचा विवाह झाला होता. त्यानंतर बांगलादेशमध्ये नऊ वर्षे लष्करी राजवट होती आणि त्यानंतर १९९१ मध्ये खालिदा झिया यांनी देशाची सूत्रे हाती घेतली. महिला पंतप्रधान म्हणून त्यांचा कार्यकाळ लक्षात ठेवला जातो. तथापि, शेख हसीनाच्या तुलनेत भारताबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन फारसा चांगला नव्हता. बांगलादेशातील जनरल हुसेन मुहम्मद इर्शाद यांची लष्करी राजवट संपवण्यासाठी त्यांनी सात पक्षांची युती स्थापन केली.

१९८३ ते १९९० दरम्यान खालिदा झिया यांना सात वेळा ताब्यात घेण्यात आले. तथापि, त्या त्यांच्या भूमिकेवर ठाम राहिल्या आणि १९८६ च्या निवडणुकांवरही बहिष्कार टाकला. १९९१ मध्ये जेव्हा त्यांनी सत्ता हाती घेतली तेव्हा त्यांनी बांगलादेशात संसदीय व्यवस्था लागू केली. शिवाय, निष्पक्ष निवडणुका सुनिश्चित करण्यासाठी अंतरिम सरकार स्थापन करण्याची व्यवस्था करण्यात आली.

### द्रमुक संविधानाचा अनादर करत आहे

**मदुराई (तामिळनाडू) :** केंद्रीय मंत्री एल मुरुगन यांनी सत्ताधारी द्रमुकवर कार्तिगाई दीपम दिवा लावण्याच्या प्रकरणातील उच्च न्यायालयाच्या निकालाचा आदर न करून आणि हिंदूंच्या उपासनेच्या अधिकाराला "प्रतिबंध" करून संविधान आणि बीआर आंबेडकरांचा "अनादर" केल्याचा आरोप केला. द्रमुक सरकारने मुरुगन भाविकांना रोखले. भारतीय द्रमुकला भाविकांना धार्मिक विधी करण्यापासून रोखण्याचा कोणताही अधिकार नाही, असे मुरुगन यांनी येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

---

# बलुची हल्ल्यात १० पाक सैनिक ठार

### बीएलएफने केला दावा; झाओ, बरखान येथे हल्ले

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पाकिस्तानच्या अशांत बलुचिस्तानमधून एक मोठी बातमी आली आहे. बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट (बीएलएफ) ने दावा केला आहे की त्यांनी अनेक हल्ल्यांमध्ये १० पाकिस्तानी सैन्य सैनिकांना ठार मारले आहे. बीएलएफ ने सोमवारी सांगितले की त्यांच्या लढाऊंनी झाओ, बरखान, तुम्प आणि तुर्बत येथे अनेक हल्ले केले ज्यामध्ये पाकिस्तानी सैन्याचे १० सदस्य मारले गेले. बलुच सशस्त्र गटांनी किमान १५ सैनिकांना ठार मारल्याच्या कृत्यांची जबाबदारी स्वीकारल्यानंतर एका दिवसापेक्षा कमी वेळात हे हल्ले झाले आहेत.

बीएलएफचे प्रवक्ते मेजर गोहराम बलोच म्हणाले की, गटाच्या सैनिकांनी २८ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता आवारन जिल्ह्यातील झाओ भागात पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यावर हल्ला केला. त्यांनी सांगितले की, या हल्ल्यात लष्कराच्या पायदळ गस्ती पथकाला, बॉम्ब निकामी करणाऱ्या पथकाला आणि पिकअप ट्रकला लक्ष्य करण्यात आले होते, हे सर्व एकाच ठिकाणी होते. बलुचिस्तान पोस्टच्या वृत्तानुसार, या हल्ल्यात शत्रूचे आठ सैनिक जागीच ठार झाले आणि तीन जण गंभीर जखमी झाले.

ताफ्याच्या संरक्षणासाठी तैनात केलेले एक चिलखती वाहन हल्ल्यादरम्यान मागे हटले आणि मृतदेह आणि जखमी सैनिक मागे सोडले. त्यांनी दावा केला की त्या रात्री बरखान जिल्ह्यातील राखनीजवळील स्राती-टिक परिसरातील एका लष्करी छावणीला लक्ष्य करून दुसरा हल्ला करण्यात आला.

निवेदनानुसार, दहशतवाद्यांनी रॉकेट-प्रोपेल्ड ग्रेनेडसह जड शस्त्रांचा वापर केला, ज्यामुळे आरपीजी शेल छावणीच्या आत पडल्याने दोन जवानांचा मृत्यू झाला आणि एक जखमी झाला. बीएलएफने सांगितले की, तिसरा हल्ला २८ डिसेंबर रोजी तुम्पच्या गोमाजी भागात करण्यात आला, जिथे दहशतवाद्यांनी सुरक्षा दलाच्या चौकीवर अनेक गोळ्या झाडल्या, ज्यामुळे तेथे तैनात पाकिस्तानी सैन्याचे नुकसान झाले, असे बलुचिस्तान पोस्टने वृत्त दिले आहे शिवाय, गटाने म्हटले आहे की त्यांच्या लढाऊ सैनिकांनी २७ डिसेंबर रोजी रात्री ८:२० वाजता मध्य तुर्बत येथील नौदल छावणीच्या मुख्य प्रवेशद्वारावर पाकिस्तानी नौदलाच्या कर्मचाऱ्यांवर ग्रेनेड हल्ला केला, असा दावा त्यांनी केला.

---

### प्रशासकीय न्यायाधिकरणाचा महत्त्वपूर्ण निर्णय

# डीआरडीओ महासंचालकांची नियुक्ती रद्द

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** एका महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णयात , हैदराबादस्थित केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठाने डॉ. जयतीर्थ आर. जोशी यांची ब्रह्मोस एरोस्पेसच्या महासंचालक (डीजी) म्हणून केलेली नियुक्ती रद्द केली आहे. २९ डिसेंबर रोजी देण्यात आलेला हा निर्णय ब्रह्मोस एरोस्पेसच्या सर्वोच्च नेतृत्वाशी संबंधित आहे. ब्रह्मोस एरोस्पेस हा भारत आणि रशियाचा संयुक्त उपक्रम आहे आणि ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राच्या निर्मितीसाठी ओळखला जातो.

माध्यमातील वृत्तानुसार, संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेचे (डीआरडीओ) एक प्रतिष्ठित शास्त्रज्ञ डॉ. एस. शिवसुब्रमण्यम नंबी नायडू यांनी ही याचिका दाखल केली होती. त्यांनी असा युक्तिवाद केला की त्यांची ज्येष्ठता, अनुभव आणि पदानुक्रम असूनही, त्यांना दुर्लक्षित करण्यात आले, तर एका कनिष्ठ अधिकाऱ्याला डीजी ब्रह्मोस मध्ये नियुक्त करण्यात आले.

आपल्या आदेशात, कॅटने २५ नोव्हेंबर २०२४ चा कार्यालयीन आदेश रद्द केला, ज्याद्वारे डॉ. जयतीर्थ आर. जोशी यांची १ डिसेंबर २०२४ पासून डीजी (ब्रह्मोस) म्हणून नियुक्ती करण्यात आली. न्यायाधिकरणाने अधिकाऱ्यांना आदेशाची प्रत मिळाल्यापासून चार आठवड्यांच्या आत डीजी ब्रह्मोससाठी निवड प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याचे निर्देश दिले.

या प्रकरणाची सुनावणी डॉ. लता बसवराज पाटणे (न्यायिक सदस्य) आणि वरुण सिंधू कुल कौमुदी (प्रशासकीय सदस्य) यांच्या दोन सदस्यीय कॅट खंडपीठासमोर झाली. खंडपीठाने ६ नोव्हेंबर २०२५ रोजी आपला निर्णय राखून ठेवला, जो २९ डिसेंबर २०२५ रोजी देण्यात आला. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी डॉ. नायडू यांना प्रतिष्ठित शास्त्रज्ञ (वेतन पातळी-१६) म्हणून बढती देण्यात आली, जी शास्त्रज्ञांची सर्वोच्च श्रेणी आहे. नियुक्तीच्या वेळी डॉ. जयतीर्थ आर. जोशी हे उत्कृष्ट शास्त्रज्ञ (वेतन पातळी-१५) या पदावर होते. याचिकाकर्त्याने असा दावा केला की तो वेतन पातळी १५ वर डॉ. जोशी यांच्यापेक्षा सहा वर्षांनी वरिष्ठ होता आणि निवड समितीच्या शीर्षस्थानी देखील होता. न्यायाधिकरणाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, डॉ. नायडू यांनी डॉ. जोशी यांच्यापेक्षा खूप आधी लेव्हल १५ पदांवर काम केले होते हे रेकॉर्डवरून स्पष्ट होते, जे दुर्लक्षित करता येणार नाही.

डीआरडीओने नियुक्तीचा बचाव करताना म्हटले की, डीआरडीएस नियम, २०२३ अंतर्गत, डीआरडीओ अध्यक्षांना, सेवा प्रमुख म्हणून, कोणत्याही महत्त्वाच्या धोरणात्मक पदावर सर्वात योग्य वरिष्ठ शास्त्रज्ञाची नियुक्ती करण्याचा अधिकार आहे. डीआरडीओने असाही युक्तिवाद केला की डीजी (ब्रह्मोस) हे पद एक हस्तांतरण पोस्टिंग आहे आणि त्यात कोणतेही अतिरिक्त आर्थिक फायदे नाहीत, म्हणून ज्येष्ठता हा एकमेव आधार असू शकत नाही. तथापि, कॅटने असा युक्तिवाद केला की भारताच्या प्रमुख क्षेपणास्त्र प्रकल्पाशी संबंधित अशा उच्चस्तरीय पदासाठी गुणवत्ता-सह-ज्येष्ठतेच्या स्थापित तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे, जे या प्रकरणात दुर्लक्षित करण्यात आले. डॉ. नायडू यांचे प्रतिनिधित्व करणारे वकील ए. श्रीनिवास रोहित यांनी डॉ. जोशी यांची नियुक्ती रद्द करण्याचीच नव्हे तर त्यांच्या अशिलाची थेट नियुक्ती करण्याची मागणी केली होती.